मंगळवार, १७ मे २०२२
# राम प्रहर
◆ वर्ष १४ ◆ अंक २९९
www.ramprahar.com
◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग

‘उद्धव ठाकरेंना मुख्यमंत्री म्हणायला लाज वाटते’/२
उन्हाचे वाढते चटके विषयावर नेरळमध्ये होणार विचारमंथन/५
श्रीवर्धनमधील क्रिकेट स्पर्धेत ‘एसजीसीसी लायन’ जेता/८

### भगवान बुद्धांची जन्मभूमी लुंबिनीला पंतप्रधान मोदींची भेट



**काठमांडू :** नेपाळ दौऱ्यावर असलेले भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सोमवारी (दि. १६) भगवान गौतम बुद्धांची जन्मभूमी असलेल्य लुंबिनीला भेट दिली. या वेळी पंतप्रधान मोदी म्हणाले की, नेपाळशिवाय आमचे रामही अपूर्ण आहेत. आज भारतात भव्य राम मंदिर उभारले जात असताना नेपाळमधील लोकांनाही याचा आनंद असेल. हा देश आपली संस्कृती जपणार आहे. आपला सामायिक वारसा म्हणजे आपली संस्कृती आणि आपले प्रेम आहे. हे आमचे भांडवल आहे. ते जेवढे मजबूत असेल तेवढेच आपल्याला बुद्धाचा संदेश जगापर्यंत पोहचवता येईल. पंतप्रधान मोदींनी पुढे म्हटले की, माझा जन्म ज्या वडनगरमध्ये झाला ते प्राचीन काळी बौद्ध शिक्षणाचे मोठे केंद्र होते. तेथे आजही मोठ्या प्रमाणावर अवशेष निघत आहेत. काशीच्या जवळच असलेल्या सारनाथसोबतची माझी आत्मियता आपल्यालाही माहीत आहे.

# ‘मविआ’तील काँग्रेस-राष्ट्रवादीत संघर्ष

## ■ काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेंची राष्ट्रवादीविरोधात हायकमांडकडे तक्रार

**मुंबई : प्रतिनिधी**

भंडारा आणि गोंदिया स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीनंतर काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये संघर्ष निर्माण झाला आहे. महाविकास आघाडी सरकारमध्ये सोबत असतानाही राष्ट्रवादी ही काँग्रेसला अडचणीत आणतेय, असा आरोप करीत काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी राष्ट्रवादीविरोधात थेट पक्षश्रेष्ठी सोनिया गांधी यांच्याकडे तक्रार केली आहे.





काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, भंडारा, गोंदिया जिल्हा परिषद निवडणुकीच्या निकालानंतर महाविकास आघाडीतील तिन्ही पक्षांनी एकत्र येऊन सत्ता स्थापन करण्याचे ठरवले होते. ३० जानेवारी २०२२ रोजी याबाबतचे पत्र तिन्ही पक्षांनी काढले. त्यावर माझ्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि शिवसेनेकडून सुभाष देसाई यांनी स्वाक्षऱ्या केल्या होत्या, मात्र राष्ट्रवादीने पाठीत खंजीर खुपसला.

पटोले पुढे म्हणाले, प्रामाणिकपणे मैत्री करणे आणि मैत्री निभावणे ही काँग्रेसची भूमिका आहे. आम्ही कायमच आघाडी धर्म पाळला आहे. आम्ही समोरून लढतो, पाठीमागून वार करीत नाही. माझ्यावर टीका करणाऱ्यांची पार्श्वभूमी सर्वांना माहिती आहे. त्याबाबत मी काही बोलण्याची गरज नाही. गेली अडीच वर्षे सत्तेत सोबत राहून राष्ट्रवादीने आम्हाला कशी वागणूक दिली या संदर्भात मी पक्षश्रेष्ठींना अवगत केले आहे.

दगाफटका खपवून घेणार नाही. आम्ही कधीही सत्तेसाठी लांगूलचालन केले नाही. जे काही करतो ते खुलेआम करतो. काँग्रेस पक्ष विकासाची आणि विचारांची लढाई लढत आहे. आम्ही परिणामाची चिंता करीत नाही, असे म्हणत पटोले यांनी राष्ट्रवादीला इशारा दिला आहे.

हायकमांडने तक्रार ऐकून घेतली असून येणाऱ्या काळात त्याचे परिणाम दिसतील, असा दावाही पटोले यांनी केला आहे.

# रक्तदान सर्वश्रेष्ठ दान!

## पनवेलमध्ये शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीच्या ज्येष्ठ निरूपणकार पद्मश्री आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या वाढदिवसानिमित्त डॉ. सचिन धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल येथील विरूपाक्ष सभागृहात सोमवारी (दि. १६) रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ११७७ जणांनी रक्तदान करून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.





हल्ली सर्वत्र रक्ताची गरज भासत आहे. रक्ताचा तुटवडा दूर करण्यासाठी आयोजित या शिबिरात रक्तदान करण्यासाठी श्रीसदस्यांनी सकाळपासूनच शिस्तबद्ध पद्धतीने सहभाग नोंदविला होता.

या वेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, महापौर डॉ. कविता चौतमोल, उपमहापौर सीताताई पाटील, ज्येष्ठ नेते बाळासाहेब पाटील, आयुक्त गणेश देशमुख, सभापती वृषाली वाघमारे, नगरसेवक राजू सोनी, मनोहर म्हात्रे, मनोज भुजबळ, नगरसेविका रूचिता लोंढे, जितेंद्र वाघमारे डॉ. ययाती गांधी तसेच डी. वाय. पाटील, एमजीएम, तेरणा हॉस्पिटलमधील डॉक्टर, नर्स, कर्मचारी उपस्थित होते.

# कोरोना संकटकाळातील अतुलनीय कार्याबद्दल श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ सन्मानित



(छाया : लक्ष्मण ठाकूर)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या आणि सेवाभावी कार्यात अग्रेसर असलेल्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाने वैश्विक महामारी कोरोनाच्या संकटकाळात शहरी व ग्रामीण भागातील तळागाळात मदतीचा हात देऊन लाखो नागरिकांना संरक्षित केले आहे. त्याबद्दल पनवेल महापालिकेच्या वतीने कृतज्ञता सन्मान पुरस्कार देऊन श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचा सोमवारी (दि. १६) सोहळ्यात गौरव करण्यात आला.

पनवेल महापालिकेच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित स्पर्धा, टाकाऊपासून टिकाऊ स्पर्धा आणि स्वच्छ भारत अभियान २०२२ तसेच स्वच्छतादूत गौरव समारंभ शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात झाला. या वेळी आयुक्त गणेश देशमुख यांच्या हस्ते श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाला सन्मानित करण्यात आले. या सन्मानाचा स्वीकार मंडळाचे सचिव व सभागृह नेते परेश ठाकूर यांनी केला. सन्मानचिन्ह आणि कृतज्ञता सन्मान प्रमाणपत्र असे या सन्मानाचे स्वरूप आहे.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, महापौर डॉ. कविता चौतमोल, आयुक्त गणेश देशमुख, उपमहापौर सीताताई पाटील, भाजपचे शहर अध्यक्ष जयंत पगडे, सभागृह नेते परेश ठाकूर, विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, स्थायी समिती सभापती नरेश ठाकूर यांच्यासह नगरसेवक-नगरसेविका, विविध संस्था-संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

कोरोना महामारीमुळे संपूर्ण जगावर मोठे संकट कोसळले. नोकरी, धंदा, व्यवसायावर संक्रात आली. या महामारीत जीव वाचवताना सर्वसामान्यांना पोटाच्या खळगीचा प्रश्न निर्माण झाला. अशा या भूतो न भविष्यति संकटकालीन परिस्थितीत माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, सचिव परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली लाखो जणांना मदतीचा हात देण्यात आला. **(पान २ वर..)**

## निवडक

### ना. स्मृती इराणी यांच्या कार्यक्रमात राष्ट्रवादीचा राडा

**पुणे :** केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांच्या पुण्यातील कार्यक्रमात सोमवारी (दि. १६) राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी राडा केला. बालगंधर्व मंदिरात ना. इराणी यांच्या उपस्थितीत पुस्तक प्रकाशनाचा कार्यक्रम सुरू असताना राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांनी घुसून घोषणाबाजी केली. या वेळी भाजप कार्यकर्त्यांनीही आक्रमक होत गोंधळ घालणाऱ्या राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना प्रत्युत्तर दिले. अखेर पोलिसांनी राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना बाहेर काढले.

### अयोध्या दौऱ्यापूर्वी राज ठाकरे घेणार पुण्यात सभा

**पुणे :** मुंबई, ठाणे आणि औरंगाबादनंतर आता मनसेप्रमुख राज ठाकरे यांची पुण्यातही सभा होणार आहे. त्यासाठी मनसेकडून पुणे पोलिसांकडे परवानगीकरिता अर्ज करण्यात आला आहे. परवानगी मिळाल्यानंतर सभेची तारीख निश्चित होईल.

# श्रीवर्धनमध्ये एसटी बसला अपघात; १४ प्रवासी जखमी

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन आगाराची एसटी बस सोमवारी (दि. १६) सकाळी साखरोणे फाटा येथे रस्त्यावरच उलटली. या अपघातात १४ प्रवासी जखमी झाले आहेत.



(छाया : भारत चोगले)

श्रीवर्धन आगाराची नियमित फेरी असणारी बागमांडला ते श्रीवर्धन ही एसटी बस (एमएच १४-बीटी २७३८) बागमांडला येथून मार्गस्थ होऊन कोलमांडला, धारीवलीमार्गे श्रीवर्धन येथे येत होती. साखरोणे फाटा येथील तीव्र उतारावर खड्डे चुकवताना गाडीचा ब्रेक न लागल्यामुळे चालकाने गाडी डोंगराच्या दिशेने वळवली असता ती उलटून अपघात झाला. या बसमध्ये एकूण १९ प्रवासी होते. त्यातील १४ प्रवासी जखमी झाले आहेत. त्यांच्यावर प्राथमिक उपचार करून घरी सोडण्यात आले आहे.

बसचालकाने प्रसंगावधान दाखवल्यामुळे मोठा अनर्थ टळला आहे. प्रवाशांच्या म्हणण्यानुसार चालकाने बस डोंगराच्या दिशेने न वळवता उजव्या बाजूला वळली असती, तर ६० फुट खोल दरीत गाडी कोसळून भीषण अपघात झाला असता. त्याचप्रमाणे प्रशासनाने दाखवलेल्या तत्परतेमुळे जखमी प्रवाशांना वेळेत योग्य उपचार मिळाले.

# जेएनपीएच्या रेल्वे यार्ड, प्रशासकीय भवनाचे केंद्रीय मंत्री सर्वानंद सोनोवाल यांच्या हस्ते उद्घाटन

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

जेएनपीएने बंदरात बांधलेल्या डीएफसी कंप्लायंट रेल यार्ड आणि नुकत्याच नूतनीकरण केलेल्या प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन केंद्रीय बंदरे, नौकानयन आणि जलमार्ग आयुषमंत्री सर्वानंद सोनोवाल यांच्या हस्ते रविवारी (दि. १५) करण्यात आले. या वेळी त्यांनी जेएनपीएच्या पहिल्या शाश्वतता अहवालाचे प्रकाशन करताना बंदरातील विविध पायाभूत सुविधा आणि विकास प्रकल्पांचा आढावा घेतला.



३३व्या वर्षात पदार्पण करणाऱ्या जेएनपीएच्या यशस्वी कामगिरीबद्दल अभिनंदन करतानाच केंद्रीय मंत्री सर्वानंद सोनोवाल यांनी केंद्र सरकारच्या बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्रालयाच्या पीएम गतिशक्ती राष्ट्रीय मास्टर प्लॅन, सागरमाला, एमआयव्ही २०३० आदी विविध उपक्रमांमध्ये जेएनपीएने अतिशय महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. मागील तीन दशकांतील जेएनपीएच्या विविध विकासकामे आणि योगदानामुळेच या बंदराने जागतिक स्तरावर स्वत:ची अशी वेगळी ओळख निर्माण केली असल्याचे सांगितले, तर जेएनपीएचे अध्यक्ष संजय सेठी यांनी बंदराच्या मागील ३२ वर्षांतील प्रगतीचा आलेख मांडला. या वेळी उपाध्यक्ष उन्मेष वाघ व इतर अधिकारी उपस्थित होते.

दरम्यान, केंद्रीय मंत्री सर्वानंद सोनवाल यांचे आगमन होताच त्यांचे भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांनी स्वागत केले. भाजप उरण तालुकाध्यक्ष रवी भोईर, जिल्हा चिटणीस चंद्रकांत घरत, शहराध्यक्ष कौशिक शाह आणि सहकारी सोबत होते. **(संबंधित वृत्त पान ३ वर..)**

# खुशखबर! मान्सून अंदमानात दाखल

## ■ पुढील दोन दिवसांत केरळमध्ये मुसळधार पावसाची शक्यता

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

सर्वांनी सुखावणारी आणि दिलासा देणारी बातमी समोर आली आहे. अखेर मान्सून अंदमानच्या समुद्रात दाखल झाला आहे. जवळपास आठवडाभर आधीच मान्सून सोमवारी (दि. १६) अंदमानात पोहचला. पुढील दोन दिवसांत केरळ किनारपट्टीवर मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.



अंदमानच्या समुद्रात मान्सून दाखल झाल्याची माहिती भारतीय हवामानशास्त्र विभागानं दिली. तापमान वाढीमुळे सर्वांना त्रास सहन करावा लागत होता, परंतु आता मान्सून दाखल झाल्याने उष्णतेपासून काही प्रमाणात दिलासा मिळणार आहे. सहा दिवस आधीच मान्सून अंदमानच्या समुद्रात आला आहे. २७ मे रोजी मान्सून केरळमध्ये दाखल होण्याचा अंदाज आहे, तर केरळ आणि लक्षद्वीपमध्ये १८ मेपर्यंत मुसळधार पावसाची शक्यता आहे.

नैऋत्य मोसमी वाऱ्यांच्या हालचालीसाठी दक्षिण भारतात पोषक हवामान निर्माण झाले आहे. त्यामुळे संबंधित परिसरात बहुतांशी ठिकाणी पावसाची शक्यता आहे, तर काही ठिकाणी ढगाळ हवामानाची नोंद करण्यात आली आहे. अंदमान निकोबार बेटांवरील बहुतांशी ठिकाणी मान्सूनचे आगमन झाल्यानंतर दक्षिण बंगालच्या उपसागरातदेखील मान्सून धडकला आहे.

दरम्यान, कोकण किनारपट्टीसह राज्यातील नऊ जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. त्यामुळे महाराष्ट्रातदेखील अनेक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. १६ ते १९ मेदरम्यान महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांत पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे. पश्चिम महाराष्ट्रासह, मराठवाडा आणि कोकणात पावसाची शक्यता आहे. पाऊस पडण्याची शक्यता असलेल्या जिल्ह्यांमध्ये कोल्हापूर, सातार, सांगली तसेच मराठवाड्यातील परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर या जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. त्याचप्रमाणे कोकणातील रत्नागिरी आणि सिंधुदुर्गमध्ये हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे.

# केळवण्यातही ‘हर घर नल, हर घर जल’

## ■ आमदार महेश बालदी यांच्या हस्ते योजनेचा शुभारंभ




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या स्वप्नातील जलजीवन मिशन अंतर्गत देशात हर घर नल, हर घर जल अभियान राबविण्यात येत आहे. त्या अंतर्गत पनवेल तालुक्यातील केळवणे येथे ७९ लाख ३३ हजार रुपयांच्या नळ पाणीपुरवठा योजनेच्या कामाचे भूमिपूजन आमदार महेश बालदी यांच्या हस्ते रविवारी (दि. १५) करण्यात आले.

या समारंभास जि. प. सदस्य ज्ञानेश्वर घरत, केळवणे भाजप गाव अध्यक्ष रामचंद्र मोकल, उपसरपंच उज्ज्वला ठाकूर, दिघाटीचे सरपंच अमित पाटील, आपट्याचे माजी सरपंच दत्ता पाटील, ताऱ्याचे माजी उपसरपंच विद्याधर जोशी, उद्योगपती राजू पाटील, केळवण्याचे माजी उपसरपंच भानूदास गावंड, भाजप युवा मोर्चा केळवणे पंचायत समिती विभागीय अध्यक्ष सुशील ठाकूर, उपाध्यक्ष सुबोध ठाकूर, ग्रामपंचायत सदस्य पांडुरंग म्हात्रे, मुक्ताबाई माळी, शर्मिला माळी, सीता ठाकूर, राजेंद्र ठाकूर, भाजप नेते विलास ठाकूर, योगेश घरत, सुरज घरत, राजेंद्र ठाकूर, तेजस माळी, हरिश्चंद्र माळी, संजय पाटील, राजेश घरत, महादेव म्हात्रे, संजय पाटील, समीर ठाकूर, के. जी. पाटील, मिलिंद कोळी, संजय कोळी, पांडुरंग पाटील, कृष्णा म्हात्रे, अनंता गावंड, सुरज घरत, परमेश घरत, बाळू ठाकूर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या योजनेंतर्गत केळवणे गावामध्ये प्रत्येक घरात पाणी मिळणार असल्याने ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण असून त्यांनी भारतीय जनता पक्ष आणि आमदार महेश बालदी यांचे आभार मानले, तर ५० महिलांना शिलाई मशीन दिल्याबद्दल जि. प. सदस्य ज्ञानेश्वर घरत यांना धन्यवाद दिले.

# केतकी चितळेचा लॅपटॉप जप्त

**पनवेल : वार्ताहर**

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्याविरोधात आक्षेपार्ह पोस्ट करणारी अभिनेत्री केतकी चितळेचा लॅपटॉप पोलिसांनी जप्त केल्याचे वृत्त आहे. त्यामुळे तिच्या अडचणीत वाढ होण्याची चिन्हे आहेत.

१८ मेपर्यंत पोलीस कोडठी सुनावलेल्या केतकीला सोमवारी (दि. १६) ठाणे पोलीस कळंबोली येथील घरी घेऊन आले होते. या वेळी तिचा लॅपटॉप आणि इतर कागदपत्रे पोलिसांनी जप्त केली. यामध्ये आणखी काही आक्षेपार्ह माहिती मिळतेय का याची तपासणी पोलीस करणार आहेत. केतकीला अटक करताना पोलिसांनी आधीच तिचा मोबाईल जप्त केला होता. दरम्यान, केतकीविरोधात १५ ठिकाणी गुन्हा दाखल झाला आहे.

# उद्धव ठाकरेंना मुख्यमंत्री म्हणायला लाज वाटते

## केंद्रीय मंत्री नारायण राणेंचा घणाघात

**मुंबई : प्रतिनिधी**

उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्री म्हणायला लाज वाटते, अशा शब्दांत त्यांच्यावर केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी हल्लाबोल केला आहे. मुख्यमंत्री ठाकरे यांच्या मुंबईतील सभेतील भाषणावर मंत्री राणे यांनी सोमवारी (दि. १६) पत्रकार परिषदेत सडकून टीका केली.

मंत्री राणे म्हणाले की, मोठा गवगवा करून उद्धव ठाकरेंनी बीकेसीत जाहीर सभा घेतली. कुठलीही निवडणूक नाही तरीही एवढी जाहिरातबाजी करून त्यांना सभा घ्यावी लागली. शक्तीप्रदर्शन करण्यासाठी त्यांनी ही सभा घेतली. या सभेला इतका जास्त खर्च केलाय की, त्यांना महाराष्ट्राचे




मुख्यमंत्री म्हणायला मला लाज वाटते. यशवंतराव चव्हाणांपासून देवेंद्र फडणवीसांपर्यंत अनेक मुख्यमंत्री झाले. त्यांनी आपल्या प्रतिमेबरोबरच महाराष्ट्राची प्रतिमा वाढवण्याचे काम केले. दिग्गज होते सगळे. राज्यातून नंतर अनेक जण दिल्लीला गेले आणि देशातही आपली कारकीर्द त्यांनी गाजवली, पण परवाचे भाषण ऐकल्यानंतर वाईट वाटले. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडून हे अपेक्षित नव्हते.

लोकांच्या चुली पेटवायला निघालात? उलट लोकांचे जीवन उद्ध्वस्त करायला निघाला आहात. दिशा सालियानचा संसार उद्ध्वस्त केलात, सुशांत सिंगचा केलात, पूजा चव्हाणचे जीवन उद्ध्वस्त केले आणि चुली पेटवणार म्हणतात. मुख्यमंत्र्यांचे भाषण म्हणजे खोटारडेपणा आणि बोगसपणा आहे, असेही मंत्री राणे यांनी म्हटले.

२५ वर्षे युती केली आणि मुख्यमंत्रिपदासाठी गद्दारी केली. अडीच वर्षे कोणतेही काम झाले नाही. ना मंत्रालय, ना कॅबिनेट, ना अधिवेशन. असला कसला मुख्यमंत्री असतो. आता काही पुळचट माणसे आहेत. त्यामुळे शिवसेनेची दुर्दशा आहे, असाही टोला ना. राणे यांनी लगावला.

### शिवसंपर्क नव्हे; तर शिव्या संपर्क अभियान

**चेष्टा, विनोद करणे सोपे आहे, पण बाळासाहेब ठाकरे यांनी मला मुख्यमंत्री केले. तुम्ही १० वर्षे मुख्यमंत्री राहिलात तरी माझ्या आठ महिन्यांच्या कामाची बरोबरी करू शकणार नाही. तुमचे शिवसंपर्क अभियान नव्हे; तर शिव्या संपर्क अभियान आहे. सभेमध्ये फेरीवाले आणून बसवले होते. त्यांचा शिवसेनेशी संबंध काय, असा सवाल या वेळी ना. नारायण राणे यांनी केला.**

# संजय राऊतांविरोधात १०० कोटींचा मानहानी दावा –किरीट सोमय्या

## टॉयलेट घोटाळ्याच्या नावाखाली बदनामी केल्याचा आरोप

**मुंबई : प्रतिनिधी**

टॉयलेट घोटाळ्याच्या नावाखाली बदनामी झाल्याचे सांगत भाजप नेते किरीट सोमय्या हे शिवसेना नेते खासदार संजय राऊत यांच्याविरोधात १०० कोटींचा मानहानी दावा दाखल करणार आहेत. स्वतः सोमय्या यांनी याबाबत माहिती दिली.

शिवसेना नेते संजय राऊत यांनी भाजप नेते किरीट सोमय्या आणि त्यांच्या पत्नी मेधा सोमय्या यांच्यावर आरोप केले होते. या प्रकरणात मेधा सोमय्या या राऊत त्यांच्याविरोधात १८ मे रोजी सकाळी ११ वाजता मुंबईतील शिवडी न्यायालयात फौजदारी मानहानीचा दावा/तक्रार दाखल करणार आहेत, असे किरीट सोमय्या यांनी म्हटले आहे. या संदर्भात त्यांनी एक ट्वीटही केले आहे.

संजय राऊत यांना मानहानी, बदनामीची नोटीस देण्यात आली आहे. याबाबत मुलूंड पोलीस ठाण्यात तक्रारही दाखल केली आहे. एक रुपयाचाही घोटाळा झालेला नसताना, घोटाळ्याचे पुरावे-कागदपत्र नसताना संजय राऊत यांनी फक्त भीतीसाठी, बदनाम करण्यासाठी अपप्रचार केला आहे, असा आरोप किरीट सोमय्या यांनी केला आहे. माझ्यावर लावलेले आरोप खोटे आहेत. कोणत्या आधारावर १०० कोटींचा घोटाळा झाला? असा सवाल करीत हा प्रकल्प पथदर्शी प्रकल्प होता. जमीनदेखील सरकारची आहे, असे सोमय्यांनी स्पष्ट केले आहे.

# मुंबईसाठी २२ दिवस धोक्याचे

## नेहमीप्रमाणे मुंबईची तुंबई करणार का? आमदार नितेश राणे यांचा सवाल

**मुंबई : प्रतिनिधी**

पावसाळा तोंडावर आला की, मुंबईत नालेसफाईची कामे करीत असल्याचा दिखावा केला जातो. ठिकठिकाणी पाणी तुंबू नये यासाठी विविध उपाययोजना केल्या असे सांगण्यात येते मात्र याव्यतिरिक्त मुंबईची तुंबई होण्यास कारणीभूत ठरते ती समुद्राला येणारी भरती. यंदा जून ते सप्टेंबर महिन्यात २२ दिवस समुद्राला मोठी भरती येणार आहे. त्यामुळे या कालावधीत मुसळधार पाऊस झाला तर तुंबई होईल, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

यावरून भाजप आमदार नितेश राणे यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना पत्र लिहिले आहे. यात त्यांनी २६ जुलैच्या परिस्थितीचीही आठवण करून दिली आहे. यावर्षी चांगला पाऊस होण्याच्या शक्यता वर्तवल्या जात आहेत. त्यामुळे पावसाळ्यात मुंबईची काय परिस्थिती असेल याची कल्पना करवत नाही. तुंबणाऱ्या या मुंबईत ३८६ धोक्याची ठिकाणे आहेत, ज्याला आपण फ्लडींग पॉईंटस म्हणतो. यापैकी २८ ठिकाणे



एकाच पश्चिम विभागतील आहेत. फक्त मांटुंगा, वडाळा, सायन भागतच यातील २५ फ्लडिंग पॉईंट्स आहेत. यंदाच्या पावसाळ्यात समुद्राला २२ दिवस भरतीही असणार आहे. त्यामुळे मुंबईत सलग २५० मिलीपेक्षा अधिक पाऊस पडला तर मुंबईला २६ जुलैच्या परिस्थितीची आठवण येईल का काय? अशी भीती आमदार नितेश राणे यांनी पत्रातून व्यक्त केली आहे.

पावसाच्या पाण्याचा निचरा या फ्लडिंग पॉईंट्स येथून झाला नाही तर मुंबईकरांना भीषण परिस्थितीला तोंड द्यावे लागेल. या मुद्यावर विविध विभागांचे मत लक्षात घेता काही धोरण आखणार आहे का? नागरिकांना संभाव्य आपत्तीजन्य परिस्थितीत काय उपाययोजना करायच्या, याविषयी आपण जनजागृती केली आहे का? या सर्व प्रश्नांची उत्तरे देणार आहात की, नेहमीप्रमाणे मुंबईला तुंबई म्हणून बदनाम करणार आहात, असा टोला नितेश राणे यांनी लगावला याहे.

### मोठ्या भरतीच्या वेळी अधिक भीती

**जून, जुलै महिन्यात प्रत्येकी सहा दिवस आणि ऑगस्ट, सप्टेंबर महिन्यात प्रत्येकी पाच दिवस मोठी भरती असणार आहे, असे आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या डेटावरून समोर आले आहे. या कालावधीमध्ये जोरदार पाऊस पडल्यास पाणी मुंबई शहरामध्ये साचून राहण्याची भीती आहे. त्यामुळे याबाबत मुंबई महानगरपालिकेने वेळेत उपाययोजना न केल्यास पुन्हा मुंबईकरांना पाणी साचण्याचा सामना करावा लागणार आहे.**

## भाजपच्या वतीने बुद्धविहारात खिरीचे वाटप

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

जगाला शांतीचा संदेश देणारे भगवान गौतम बुद्ध यांची २,५६६वी जयंती नवी मुंबईत सोमवारी (दि. १६) धार्मिक वातावरण साजरी करण्यात आली.

रबाळे येथील पंचशील बुद्ध विहारात भाजपचे माजी महापौर सुधाकर सोनवणे, भाजप माजी नगरसेविका रंजन सोनावणे यांच्या प्रमुख उपस्थितीत सकाळी बुद्धवंदना, पंचशील ध्वजारोहण करण्यात आले. बौद्ध उपासक कैलास कोरडे, राजू इंगळे, उपासिका शीला कांबळे यांनी बौद्ध अनुयायी यांना खिर वाटप केले. सीबीडी आयकर कॉलनी येथील धम्मदीप सामाजिक संस्थेचे अध्यक्ष भाजपचे युवा नेते सुभाष गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली बुद्धपौर्णिमेच्या दिनी बुद्धवंदना, ध्वजारोहण करून नागरिकांना खिर दान करण्यात आले.

# वावे येथे जमीन विक्री घोटाळा

## कोर्टाच्या आदेशाने कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील वावे गावातील दोन शेतकऱ्यांनी आपली जमीन नवी मुंबईतील एका व्यक्तीला विकली होती, मात्र शेतकऱ्यांनी चार वर्षांत जमीन विक्रीचा व्यवहार पूर्ण केला नाही. त्यामुळे खरेदीदाराने कर्जत न्यायालयात धाव घेतली. न्यायालयाच्या आदेशाने वावे गावातील त्या दोन शेतकऱ्यांवर कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधिक तपास करीत आहेत.

कर्जत तालुक्यातील वावे गावातील दोन शेतकऱ्यांनी आपली ३९ गुंठे जमीन (सर्वे नंबर २/५ अ) नवी मुंबई येथील फिलिप डिसुझा यांना विकण्याचा साठेकरार




१ जानेवारी २०१८मध्ये केला होता. यानंतर त्या दोघांनी डिसुझा यांच्याकडून वेगवेगळ्या वेळी चेकच्या माध्यमातून ४५ लाख ५० हजार एवढी रक्कम घेतली, परंतु जमीन विक्रीचा व्यवहार पूर्ण केला नाही. त्याबद्दल डिसुझा यांनी त्या दोन्ही तरुणांकडे जमीन नावावर करून देण्यासाठी अनेक वेळा भेट घेऊन विनंती केली, मात्र प्रत्येक वेळी त्या दोन तरुणांनी वेगवेगळी करणे पुढे करून जमिनीचा व्यवहार पूर्ण केला नाही.

शेवटी फिलिप डिसूजा यांनी कर्जत दिवाणी न्यायालयात धाव घेऊन आपली फसवणूक झाली असल्याचा अर्ज दाखल केला. त्या अर्जावर अनेकदा सुनावणी झाल्यानंतर न्यायालयाला डिसुझा यांची फसवणूक झाली असल्याचे म्हणणे पटले आणि त्यानंतर न्यायालयाने कर्जत पोलीस ठाणे यांना आदेश देऊन गुन्हा दाखल करायला सांगितले.

यानुसार वावे गावातील त्या दोन तरुणांवर कर्जत पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास सहाय्यक निरीक्षक सोनावणे करीत आहेत. याप्रकरणी अद्याप कोणालाही अटक झालेली नाही.

# धर्मांतरीत बौद्धांचीही आज स्वतंत्र ओळख -डॉ. शुभांशु भालाधरे

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

अनूसुचित जाती-जमातीतील बहुसंख्याक लोक आजसुद्धा धर्मांतराच्या निर्णयावर गंभीर नाहीत. महाराष्ट्रातील केवळ सहा टक्के नागरिकांनी बुद्धजीवन मार्गाने आपला प्रवास सुरू केला आहे. धर्मांतरीत बौद्धांनी वैज्ञानिक आणि निसर्गाच्या मार्गांनी म्हणजेच बुद्धांच्या विचारांनी आपली नवी ओळख सर्व क्षेत्रात निर्माण केली असल्याचे मत प्रमुख पाहुणे डॉ. शुभांशु भालाधरे यांनी सीबीडी येथे बोलताना व्यक्त केले.

बौद्ध संशोधन व प्रशिक्षण संस्था आणि पंचशील महिला मंडळाच्या संयुक्त विद्यमानने प्रसिद्ध शिक्षण तज्ज्ञ प्रा. डॉ. जी. के. डोंगरगावकर यांच्या मार्गदर्शनाखाली सीबीडी येथील बुद्धभवन, सम्राट अशोक महाविहार येथे २,५६६वी बुद्धजयंती सधम्म



चळवळीतील उपासिका आशा शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या वेळी अस्थीरोग तज्ज्ञ डॉ. शुभांशु भालाधरे बोलत होते.

शिक्षण तज्ज्ञ प्रा. डॉ. जी. के. डोंगरगावकर यांनी बोधी वृक्ष, वैशाखी पौर्णिमेचे बुद्धाच्या जीवनात आणि आजच्या काळात असलेले महत्त्व सांगितले. प्रारंभी, उपासिका मंदा भंडारे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. यानंतर भगवान बुद्धाची प्रतीमा आणि बोधीवृक्षाचे पूजन व दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचा प्रारंभ झाला. या कार्यक्रमात नारायण वाघमारे, जे. डी. कसबे, एन. एल. सुर्यवंशी, रणजीत बलखंडे, माया सुधाकर, सुजाता भोसले यासह बौद्ध अनुयायी उपस्थित होते.

# वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमांबाबत नवी मुंबई महापालिकेचे मुख्य सचिवांकडून कौतुक

**नवी मुंबई : बातमीदार**

शहरात प्रवेश केल्यानंतर लगेचच वेगळेपण नजरेत भरतेच. शहर विकासाची ही कार्यप्रणाली अशीच सुरू ठेवा आणि नवी मुंबईला अधिक स्वच्छ, सुंदर आणि आंतरराष्ट्रीय दर्जाचे आधुनिक शहर बनविण्यासाठी नवनव्या संकल्पनांची अंमलबजावणी करा, नवी मुंबई शहरामध्ये ती क्षमता असल्याचे मत शासनाचे मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव यांनी व्यक्त केले.

नवी मुंबई शहरातील विविध उल्लेखनीय प्रकल्पांची पाहणी मुख्य सचिव मनुकुमार श्रीवास्तव यांनी सोमवारी (दि. १६) केली. त्यानंतर महापालिका मुख्यालयातील विभागप्रमुखांच्या बैठकीच्या वेळी नवी मुंबईच्या स्वच्छ व सुशोभित रूपाची प्रशंसा केली. महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी नवी मुंबई महानगरपालिकेच्या वैशिष्ट्यपूर्ण कामांची व नियोजित प्रकल्प, सुविधांची माहिती सादरीकरणाद्वारे दिली.

ऐरोली येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक, अडवली भूतावली येथील झिरो वेस्ट मॉडेल, कोपरखैरणे येथील मियावाकी शहरी जंगल प्रकल्प, वाशी सेक्टर १० येथील मिनी सी शोअर परिसराचे आकर्षक रूप, शहरात ठिकठिकाणी केलेली भित्तीचित्रे व सुशोभिकरण कामे, चित्र-कविता भिंती, टाकाऊतून टिकाऊ शिल्पाकृती, कारंजे व त्यासाठी मलप्रक्रिया केंद्रातील प्रक्रियाकृत पाण्याचा केला जाणारा वापर, नाले स्वच्छ रहावेत म्हणून त्यांच्या काठांवर लावलेल्या जाळ्या, जलप्रवाहातील स्क्रिन्स, ठिकठिकाणी लावलेली पोडियम गार्डन, अभिनव स्वरूपाचे पेट कॉर्नर अशा शहरात विविध ठिकाणी असलेल्या वैशिष्ट्यपूर्ण बाबींची पाहणी करत त्यांनी या वेगळ्या संकल्पनांचे कौतुक केले.




# वैद्यकीय विभागाच्या विद्यार्थ्यांना अंतिम निकालीची प्रतीक्षा

**मुंबई : प्रतिनिधी**

वैद्यकीय विद्यार्थ्यांच्या अंतिम वर्षाचा निकाल जाहीर होण्यास विलंब झाल्यामुळे संपूर्ण शैक्षणिक वर्ष वाया जाण्याची भीती व्यक्त होत आहे. नीट पीजी २०२३ पूर्वी त्यांची अंतिम वर्षानंतर १२ महिन्यांची इंटर्नशिप पूर्ण होण्याची गरज असते. त्यामुळे इंटर्नशिप वेळेत पूर्ण न झाल्यास नीट पीजी २०२३च्या परीक्षेस मुकावे लागणार, अशी भीती या विद्यार्थ्यांना सतावत आहे.त्यामुळे एमबीबीएसचा निकाल लवकर लावण्याची मागणी होत आहे.

पान १ वरून

## श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ सन्मानित

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक मंडळाच्या माध्यमातून एक लाखाहून अधिक अन्नधान्याचे किट, कम्युनिटी किचनच्या माध्यमातून एक लाख ५० हजार व्यक्तींना अन्नछत्र, गावाला जाण्यासाठी मदत, रक्ताचा तुटवडा भरून काढण्यासाठी रक्तदान शिबिरांचे आयोजन, स्वच्छता मोहीम, आर्थिक मदत याखेरीज एक लाख अर्सेनिक अल्बम गोळ्या, सॅनिटायझर, एक लाख १० हजार मास्कचे वाटप, कोरोना काळातील गणपती सण गोड करण्यासाठी ६० हजार जणांना प्रसादासाठी अन्नधान्य अशी हरएक आवश्यक मदत करून कोरोना काळात नागरिकांना मोठा दिलासा देण्याचे काम झाले आहे. मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, सचिव परेश ठाकूर आणि सहकाऱ्यांनी कोरोना महामारीची कोणतीही तमा न बाळगता स्वतः जाऊन मदत केली. अन्नछत्राच्या माध्यमातून भुकेल्याला पोटभरून जेवू घातले. कोरोनाला घाबरून न जाता गोरगरीब, गरजूंना त्यांच्या दारापर्यंत मदत पोहचविली.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्य करणाऱ्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने मदत देताना आपला-परका असा भेद केला जात नाही. गरजवंतांना प्रथम मदत करण्याचा दृष्टिकोन ठेवून हे मंडळ काम करीत असते. एक तीळ सात जणांनी वाटून खावा ही आपली संस्कृती आणि त्या अनुषंगाने परिस्थितीने गांजलेल्या गरीब, गरजूंना सर्व प्रकारची मदत देण्याचे काम महापुराच्या आपत्तीप्रमाणे कोरोना काळातही केले गेले. एवढेच नाही तर गावागावात, शहरोशहरी सर्व सुखरूप आहेत की नाही याची विचारणाही या काळात करण्यात आली. अन्नधान्य असो किंवा मेडिकल साहित्याची मदत किंवा विचारपूस हे कार्य खऱ्या अर्थाने माणुसकीचे दर्शन घडविणारे होते. म्हणूनच श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाला अतुलनीय कार्याबद्दल शासन आणि विविध संस्थांनी सन्मानित केले आहे. त्याचबरोबर सोमवारी पनवेल महापालिकेच्या वतीने कृतज्ञता सन्मान करण्यात आला असून यानिमिताने श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.


या वेळी देण्यात आलेल्या सन्मानपत्रात म्हटले आहे की, आपल्या संस्थेच्या वतीने कोविड-१९ महामारीच्या संकटामध्ये पनवेल ग्रामीण व शहरी भागामध्ये सर्व नागरिकांना धान्य वाटप करून आपल्या संस्थेने सामाजिक बांधिलकी जोपासण्याचे काम केले आहे. संकटात सापडलेल्या नागरिकांना आधार देण्याकरिता आपल्या संस्थेने केलेले कार्य निश्चितच अनमोल आहे. आपल्या संस्थेने दिलेल्या योगदानाबद्दल पनवेल महानगरपालिका सदैव आपली आभारी आहे. आपण दिलेले योगदान व सेवाकार्य आम्हाला प्रेरणादायक आहे.

### दुखवटा



**ज्योती माळी**

**उरण** : येथील ज्योती सुभाष माळी यांचे सोमवारी (दि. ९) अल्पशा आजाराने निधन झाले. निधनासमयी त्या ४० वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले व मोठा माळी परिवार आहे. त्यांच्या अकस्मात निधनाने परिसरात शोककळा पसरली आहे. त्यांचे कार्यविधी बुधवारी (दि. १७) माणकेश्वर येथे तर शुक्रवारी (दि. २४) बालई येथे बाराव्या दिवसाचे कार्य होणार आहे.


पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
मंगळवार, दि. १७ मे २०२२ रोजी होणारे

**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**

(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड | कोव्हॅक्सिन | कार्बेव्हॅक्स

सर्व केंद्रांवर (वयोगट : १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल ■ २. रोटरी क्लब, से. १९, नवीन पनवेल
- ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे ■ ६. टाटा अॅडव्हान्स सेंटर, खारघर
- ७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- ८. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल

**Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.**

# जेएनपीएतील प्रकल्पांचा केंद्रीय मंत्री सर्वानंद सोनोवाल यांच्याकडून आढावा

## विविध उद्घाटनांसह पहिल्या शाश्वतता अहवालाचे प्रकाशन

**उरण : वार्ताहर, प्रतिनिधी**

केंद्रीय बंदरे, जहाजवाहतूक व जलमार्ग आणि आयुष मंत्री, सर्वानंद सोनोवाल यांनी जेएनपीए बंदरास भेट दिली. आपल्या भेटीदरम्यान मंत्री महोदयांनी बंदरात नुकत्याच विकसित केलेल्या व डीएफसीशी सुसंगत असलेल्या रेल्वे यार्डचे आणि नुकत्याच नूतनीकरण केलेल्या प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन केले. या वेळी सोनोवाल यांनी जेएनपीए बंदराचा पहिला सस्टेनबिलिटी रिपोर्ट प्रसिद्ध केला व बंदरातील विविध पायाभूत सुविधा आणि विकास प्रकल्पांचा आढावा घेतला.



जेएनपीए बंदराचे अध्यक्ष संजय सेठी व उपाध्यक्ष उन्मेष शरद वाघ यांनी केंद्रीय मंत्री सर्वानंद सोनोवाल आणि इतर मान्यवरांचे स्वागत केले. सोनोवाल यांना केंद्रीय औद्योगिक दलाच्या जवानांनी गार्ड ऑफ ऑनर दिला. जेएनपीए बंदरातील विविध प्रकल्पांबाबत केंद्रीय मंत्री महोदयांना माहिती देताना बंदराचे अध्यक्ष संजय सेठी म्हणाले, जेएनपीएमध्ये अनेक पायाभूत सुविधा आणि इतर विकासात्मक प्रकल्प व हरित बंदर उपक्रम सुरू आहेत. ज्यामुळे जेएनपी बंदराच्या व्यवसायात वाढ होईल व पर्यायाने देशाच्या आयात-निर्यात व्यापारास चालना मिळेल. आमचे सर्व प्रकल्प मंत्रालयाच्या उपक्रमांशी अनुरूप आहेत ज्यामुळे मल्टीमॉडल कनेक्टिव्हिटी, लॉजिस्टिक खर्चात कपात आणि व्यवसाय करणे सुलभ होते.

जेएनपीए देशाच्या आर्थिक विकासामध्ये महत्वपूर्ण योगदान देण्यासाठी वचनबद्ध आहे. वस्तू आणि सेवांच्या वाहतुकीतील अडथळे दूर करण्यासाठी आणि सर्वोत्तम यंत्रणा प्रदान करून तसेच व्यापार वर्गाच्या पसंतीचे बंदर बनून जागतिक पुरवठा साखळींमध्ये सखोल एकीकरणास समर्थन देण्यासाठी आम्ही सातत्याने काम करत आहोत.

### ‘पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रयत्न’

या वेळी संजय सेठी म्हणाले, पर्यावरण संरक्षण आणि शाश्वत विकासाच्या दिशेने आमचे प्रयत्न प्रदर्शित करण्यासाठी आम्ही २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठी आमचा पहिला शाश्वतता (सस्टेनबिलिटी रिपोर्ट) अहवाल प्रसिद्ध केला आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आम्ही आवश्यक त्या सर्व उपाययोजना करीत आहोत.



पनवेल : रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया कामोठे शहर सरचिटणीस गौतम विष्णू कांबळे आणि संजय साबळे यांनी बुद्धपौर्णिमेनिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची सदिच्छा भेट घेतली.



उरण : छत्रपती संभाजीराजे महाराज यांनी सोमवारी आमदार महेश बालदी यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली. आमदार महेश बालदी यांनी त्यांचे स्वागत केले. या वेळी भाजपचे तालुकाध्यक्ष रवी भोईर, शहराध्यक्ष कौशिक शहा, मराठा क्रांती मोर्चाचे राज्य समन्वयक विनोद साबळे, अंकुश कदम, धनंजय जाधव आदी उपस्थित होते.





पनवेल : भाजप युवा मोर्चा तालुका अध्यक्ष आनंद ढवळे यांना वाढदिवसानिमित्त भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी जगदिश ढवळे, पुंडलिक ढवळे, हरिश्चंद्र घरत, जगदीश पोपेटा, अरुण पाटील, किसन भोईर, विठ्ठल पोपटा आदी उपस्थित होते.


## कामोठे येथे बुद्ध जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

आनंद बुद्ध विहार ट्रस्ट कामोठे आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया कामोठे शहर यांच्या वतीने तथागत गौतम बुद्ध यांच्या २५६६ जयंतीनिमित्त सोमवारी (दि. १६) कामोठे येथील नालंदा बुद्ध विहार येथे अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह मान्यवरांनी अभिवादन केले.

आरपीआयचे कामोठे शहराध्यक्ष रवींद्र कांबळे, नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, प्रभाग समिती ‘क’च्या सभापती नगरसेविका अरुणा भगत, सामाजिक कार्यकर्ते आर. जी. म्हात्रे, भाजपच्या कामोठे महिला मोर्चाच्या अध्यक्षा वनिता पाटील, नालंदा बुद्ध विहार अध्यक्ष मंगेश धिवार आदी उपस्थित होते.





कामोठे : भाजप कार्यालयात गौतम बुद्धांच्या जयंतीनिमित्त आमदार प्रशांत ठाकूर यांनी अभिवादन केले. या वेळी नगरसेविका कुसुम म्हात्रे, भाजप युवा मोर्चा शहर अध्यक्ष हर्षवर्धन पाटील, चिटणीस प्रवीण कोरडे, महिला मोर्चा शहर अध्यक्ष वनिता पाटील, सामाजिक कार्यकर्त्या हरजिंदर कौर, कार्यालयीन चिटणीस अमित रोकडे आदी उपस्थित होते. दरम्यान, बौद्धपौर्णिमेनिमित्त सामाजिक कार्यकर्ते रमेश तुपे यांनी कार्यालयात खीर वाटप केले.









पनवेल : महापालिकेच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित स्पर्धा, टाकाऊपासून टिकाऊ स्पर्धा आणि स्वच्छ भारत अभियान २०२२ तसेच स्वच्छतादूत गौरव समारंभ शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात सोमवारी झाला. या वेळी महापालिकेच्या वतीने कृतज्ञता सन्मान पुरस्कार देऊन विविध संस्था, संघटना, व्यक्तींना गौरविण्यात आले.

# उसर्ली बुद्रुक येथे विकासकामांचे भूमिपूजन

## भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते शुभारंभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून विविध विकासकामे सुरू आहेत. त्या अनुषंगाने उसर्ली बुद्रुक येथे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या जिल्हा नियोजन निधीमधून नवीन अंगणवाडी बांधण्यात येणार आहे, तसेच जिल्हा परिषदेच्या शाळेची दुरुस्ती ही या निधीमधून करण्यात येणार आहे. या कामांचे भूमिपूजन सोमवारी (दि. १६) भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते करण्यात आले.



ग्रामीण भागात शिक्षणापासून गरीब विद्यार्थी वंचित राहू नये म्हणून वर्षभर श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने विविध शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा वसा आमदार प्रशांत ठाकूर पुढे चालवत आहेत, असे मत तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी व्यक्त केले. त्यांनी पुढे सांगितले. जिल्हा नियोजनाच्या निधीमधून १२.५० लाख रुपयांची विकास कामाचे भूमिपूजन आज माझ्या हस्ते होतेय याचा मला आनंद आहे.

या भूमिपूजन सोहळ्याला भाजप तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, माजी सरपंच नितीन काठावले, संभाजी वारदे, अनिल निंबाळकर, माजी उपसरपंच पंकज वारदे, ग्रामपंचायत सदस्य प्रितेश डांगरकर, कच्छीन्द्र ठाकूर, किरण डांगरकर, पोलीस पाटील (उसर्ली) दीपक पाटील, बाळाराम पाटील, वसंत काठावले, दशरथ डांगरकर, गानू डांगरकर, पांडुरंग काठावले, गुलाब डांगरकर, जयवंत पाटील, प्रदीप दळवी, अंगणवाडी सेविका रंजना गोलाडे, कांचन काठावले, अंकिता काठावले आदी उपस्थित होते.





पनवेल : डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीच्या ज्येष्ठ निरूपणकार पद्मश्री आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या वाढदिवसानिमित्त डॉ. सचिन धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली विरूपाक्ष सभागृहात सोमवारी रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. आमदार प्रशांत ठाकूर, महापौर डॉ. कविता चौतमोल यांनी उपस्थित राहून शिबिराला शुभेच्छा दिल्या. या वेळी उपमहापौर सीताताई पाटील, सभापती अ‍ॅड. वृषाली वाघमारे, नगरसेवक मनोहर म्हात्रे, जितेंद्र वाघमारे आदी उपस्थित होते. दरम्यान, या शिबिरात भाजपचे पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे यांनीही रक्तदान केले.



## संपादकीय

# काँग्रेस जोडो यात्रा

देशभरातील पराभवांच्या मालिकेनंतर काँग्रेसने पक्षीय ढांचामध्ये बदल करायचे ठरवले आहे. तरुणांसाठी ५० टक्के प्रतिनिधित्व तसेच एक कुटुंब, एक तिकिट अशी संकल्पना राबवण्याचा निर्णय पक्षाने घेतला आहे. या घोषणेचे नक्कीच स्वागत करता आले असते, परंतु गांधी परिवाराचे संरक्षण करण्यासाठी त्यातही पळवाटा ठेवण्यास हा पक्ष विसरलेला नाही. सलग पाच वर्षे पक्षामध्ये सक्रीय असलेल्या कार्यकर्त्यासच उमेदवारी देण्याचे काँग्रेसने ठरवले असले तरी या घोषणा केवळ शाब्दिक बुडबुडे ठरतील हे सर्वांना माहित आहे.

**स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झालेल्या आणि स्वतंत्र भारतावर दशकानुदशके राज्य केलेल्या काँग्रेस पक्षाची अवस्था सध्या इतकी करुण झालेली आहे की, देदिप्यमान इतिहास असलेला हाच तो पक्ष आहे का, असे कोणी नवखा विचारेल. गेल्या आठ वर्षांमध्ये काँग्रेसची प्रचंड पडझड झाली. निवडणुकीच्या मैदानातील हार-जीत हा कुठल्याही राजकीय पक्षाच्या वाटचालीतील एक भाग असतो. सत्ता येते आणि जाते, परंतु सत्तेशिवायदेखील जो पक्ष धीराने जनतेसाठी सर्वस्व पणाला लावतो, त्याला असल्या हार-जीतींचे विशेष काही वाटत नाही. एकेकाळी अवघे दोन सदस्य संसदेपर्यंत पोहोचलेल्या भारतीय जनता पक्षाला काँग्रेस पक्षातील दिग्गज नेते कुत्सितपणे हसत असत. त्याच भाजपचा आज विशाल वटवृक्ष झालेला आहे आणि त्याची पाळेमुळे खोलवर रुजली आहेत. काँग्रेस पक्ष मात्र समूळ उच्चाटनाच्या मार्गावर आहे. इतके होऊनही या पक्षामध्ये सुधारणेची काही शक्यता दिसत नाही. हरवलेले नेतृत्व आणि विखुरलेले कार्यकर्ते अशी या पक्षाची स्थिती आहे. आपल्या पक्षात नवसंजीवनी फुंकण्यासाठी काँग्रेसच्या हंगामी अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी यांनी राजस्थानातील उदयपूर येथे तीन दिवसांचे नवसंकल्प शिबिर आयोजित केले होते. राजकीय, सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण, आर्थिक, संघटनात्मक बाबी, शेतकरी आणि कृषी, युवक आणि रोजगार अशा विषयांवर येथे चर्चा झाली असे समजते. विविध दिग्गज नेत्यांच्या नेतृत्वाखाली यासाठी सहा समित्या स्थापन करण्यात आल्या होत्या. या समित्यांनी आपले विस्तृत अहवाल श्रीमती गांधी यांच्याकडे सुपूर्द केले. या अहवालातील सूचना आणि प्रस्तावांच्या आधारे नवसंकल्प शिबिराच्या समारोपाला घोषणापत्र प्रसिद्ध करण्यात आले. ८० वर्षांपूर्वी १९४२ साली महात्मा गांधी यांनी ब्रिटिश राजवटीला भारत छोडो असे फर्मावले होते, त्यातून देशभरात स्वातंत्र्यलढा उभारला गेला. २०२२मध्ये देशाची घोषणा भारत जोडो हिच आहे आणि हाच उदयपूरचा नवसंकल्प असल्याचे या घोषणापत्रात म्हटले आहे. सॉफ्ट हिंदुत्व स्वीकारून निवडणुकींच्या रिंगणात उतरावे असा विचार शिबिरामध्ये काही ज्येष्ठ नेत्यांनी मांडला. त्यावर शिबिरात बरीच चर्चा झाली असे समजते. आपला पक्ष जनतेपासून तुटला आहे, तो पुन्हा जोडण्यासाठी घाम गाळावा लागेल असा सल्ला खासदार राहुल गांधी यांनी शिबिरार्थी नेते मंडळींना दिला. त्यांच्या या विधानात तथ्य असले तरी पक्षाच्या वाट्याला हे तुटलेपण का आले याचा विचार राहुल गांधी यांनीच करायला हवा. त्यांच्याच असमंजस, अविवेकी आणि अपरिपक्व राजकारणामुळे काँग्रेसवर ही अवकळा आली आहे. येत्या २ ऑक्टोबरपासून म्हणजेच गांधी जयंतीपासून कन्याकुमारी ते काश्मीर अशी पदयात्रा काढण्याचा संकल्प शिबिरामध्ये सोडण्यात आला. साडेतीन हजार किमीची ही काँग्रेसी पदयात्रा कशी पार पडणार हाच मोठा प्रश्न आहे.**

# ‘सावित्री’तील उत्खननाने पाण्याचे नैसर्गिक स्रोत धोक्यात



## खबरबात
**महेश शिंदे**

सावित्री नदीपात्रातील राजेवाडी ते केंबुर्ली क्षेत्रात पर्यटन व नौकानयन क्षेत्र सुरू करण्यासाठी यांत्रिक पद्धतीने सावित्री नदीपात्रात ड्रेझरद्वारे उत्खनन करण्यात येणार आहे, मात्र असे झाल्यास सव ते राजेवाडी या आठ किलोमीटर पट्ट्यातील परिसरातील हजारो एकर भातशेती भविष्यात नष्ट होऊन नैसर्गिक पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत, विहिरी व बोअरवेल नष्ट होण्याची शक्यता असल्याने पर्यटनाच्या नावाखाली नौकानयन हे कोणाच्या फायद्याचे? असा सवाल सव ते राजेवाडी पट्ट्यातील स्थानिक शेतकऱ्यांनी प्रशासनाला केला आहे.

महाराष्ट्र सागरी मंडळाने काढलेल्या ५ मे २०२२च्या परिपत्रकानुसार महाड तालुक्यातील सावित्री नदी, बाणकोट खाडी व महाडजवळील राजेवाडी ते केंबुर्ली या सागरी विनियम क्षेत्रातील नौकानयनाचा विकास व्हावा यासाठी नवीन नौकानयन मार्गाची आवश्यकता असल्यास केवळ नौकानयन मार्ग जलद गतीने व्हावा या उद्देशाने ड्रेझरने यांत्रिक पद्धतीने उत्खनन करण्यासाठी पर्यावरण विभागाची परवानगी घेण्याची प्रक्रिया महाराष्ट्र सागरी मंडळाकडून सुरू करण्यात आली आहे. त्याबाबतचे परिपत्रक ५ मे २०२२ रोजी रायगड जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहे.

सावित्री नदीपात्रातील बाणकोट खाडीसह महाडजवळील वाळू उपशासंदर्भात रायगड जिल्हाधिकारी यांना शासनाने सागरी मंडळाकडून प्राधिकृत केले असून पुढील कार्यवाही त्यांनी सुरू करावी, असे स्पष्ट निर्देश दिले आहेत, मात्र या निर्णयामुळे सव ते राजेवाडी पट्ट्यातील सुमारे ८ किमी. परिसरातील हजारो एकर भातशेतीत ड्रेझरद्वारे उत्खनन झाल्याने रसायनमिश्रित खाडीचे पाणी शिरून भातशेती नष्ट होईल व पिण्याच्या पाण्याचे नैसर्गिक स्त्रोतदेखील प्रदूषित होतील. एकंदरीत सव ते राजेवाडी पट्ट्यातील ड्रेझर उत्खननामुळे रहिवाशी क्षेत्रातील नागरिकांनादेखील याचा मोठा फटका बसणार आहे. सव ते राजवाडी अंदाजे आठ किलोमीटर अंतर असून नौकानयन जलवाहतूक करण्यासाठी नदी किंवा खाडीची खोली ३० मीटर खोल असणे जरुरीचे आहे, तसेच नौकानयन क्षेत्रामध्ये ज्या क्षेत्रातून नौकानयन होते त्या ठिकाणी पुलाची उंची त्या क्षेत्रात नदीची खोली जलवाहतूक करणाऱ्या बोटीची उंची याबाबतचे परिमाण कोण ठरविणार? असा प्रश्न पुढे आला आहे.

सव ते राजेवाडी जलवाहतूक करावयाची असल्यास सव ते राजेवाडीमध्ये कोणत्याही ठिकाणी व्यावसायिक बाजारपेठ नाही, तसेच जलवाहतुकीपेक्षा या दोन्ही क्षेत्रांमधील गावांना रस्तामार्गे वाहतूक करणे सोयीचे ठरत आहे. सव ते राजेवाडी जलवाहतूक करावयाची असल्यास कोणत्या ठिकाणी जेट्टी उभी करायची आणि जेट्टी उभारण्यासाठी व जेट्टीपर्यंत जाणारा रस्ता यासाठी लागणारी जमीन संपादित करावी लागणार आहे. याकरिता लागणारी जमीन प्रत्येक ठिकाणी खासगी मालकीची आहे, त्याबाबत शासनाचे धोरण काय आहे याचा निर्वाळा करण्यात आलेला नाही. सव ते राजेवाडी जलवाहतूक फायद्यापेक्षा तोट्याची असून न परवडणाऱ्या मार्गावर कोणती कंपनी आपली जलवाहतूक चालविणार? असा प्रश्नदेखील निर्माण झाला आहे. सव ते राजेवाडीपर्यंत जलवाहतूक करताना महाडजवळील दादली पुलाची उंची, पुलाचे गाळे व जलवाहतूक करणाऱ्या बोटीची लांबी, रुंदी, उंची याचा प्रशासनाला विसर पडलेला दिसतो.

सव ते राजेवाडीपर्यंत जलवाहतूक करताना शेडाव नाक्यावर गोड्या पाण्याचा डोह आहे. त्या डोहातून महाड तालुक्यातील दुर्गम व डोंगराळ भागातील गावांना तसेच महाड शहराला उन्हाळ्यात पाणीटंचाईच्या काळात या डोहातून पाणीपुरवठा टँकरद्वारे केला जातो. जर जलवाहतूक करावयाची झाल्यास राजेवाडीजवळील शेडाव दोहामधील गोडे पाणी सावित्री खाडीमधील भरतीच्या वेळी येणाऱ्या खाऱ्या व रसायनमिश्रीत पाण्यामुळे प्रदूषित होईल. त्यामुळे जलवाहतुकीमुळे महाड शहर शेडाव नाक्यावरील गोड्या पाण्याच्या डोहाला कायमस्वरूपी मुकावे लागेल. सव-राजेवाडी या मार्गावर रस्त्याने येताना शिरगाव फाट्यावर सुरक्षिततेच्या दृष्टीने पोलीस चौकी कार्यरत आहे, मात्र जलवाहतूक करावयाची झाल्यास या मार्गावर सागरी सुरक्षा योजनेबाबत काय या सागरी सुरक्षितेच्या बाबतीत सागरी पोलीस ठाणे निर्मितीबरोबरच गस्ती नौकांद्वारे २४ तास देखरेख ठेवावी लागेल. याचा खर्च कोण करणार? यामुळे राज्य शासनाने काढलेले हे परिपत्रक एकंदरीत हास्यास्पद आहे.



सव ते केंबुर्ली महाड गट अ मध्ये २,७६,४४० घनमीटर म्हणजे ९७,६८२ ब्रास वाळू तर केंबुर्ली ते महाड गट ब मधून १,५१,३७५ घनमीटर ५३,४९० ब्रास, महाड ते राजेवाडी गट क मधून ५,२६,९५५ घनमीटर म्हणजे १,८६,२०३ ब्रास इतके उत्खनन केले जाणार आहे. यातून शासनाला अंदाजे २० कोटी रुपये मिळणार आहे. यामुळे केवळ अल्पशा उत्पन्नासाठी ड्रेझरद्वारे केले जाणारे उत्खनन शेतकऱ्यांच्या शेतीवर घाला घालणारे आहे. यामुळे शासनाने काढलेले हे परिपत्रक पूरनियंत्रण करण्यासाठी आहे की, गाळ उपसा करणाऱ्या ठेकेदारांसाठी आहे? असा प्रश्न महाडकर नागरिक करीत आहेत.



## बदलते तंत्रज्ञान

### यूपीआय आयडी विसरलात? मग ‘यांची’ घ्या मदत

तुम्ही तुमचा युपीआय आयडी विसरला असाल तर आज आपण गुगल पे, पेटीएम किंवा फोनपे यांच्या मदतीने तुमचा आयडी कसा ओळखू शकतो हे जाणून घेणार आहोत.

युपीआय हे एक असे तंत्रज्ञान आहे ज्याचा उपयोग देशभरात कुठेही झटपट पैसे हस्तांतरण करण्यासाठी होतो. देशातील १५० दशलक्षाहून अधिक वापरकर्ते युपीआय वापरतात. युपीआयच्या मदतीने वापरकर्ते फक्त त्यांचा युपीआय आयडी वापरून पैसे ट्रान्सफर करू शकतात. यामुळे त्यांना बँक अकाउंट नंबर किंवा इतर कोणतेही तपशील शेअर करण्याची गरज नाही. युपीआय आयडी भीम युपीआयसह इंटिग्रेटेड केलेल्या पेमेंट ॲपमध्ये तयार करणे आवश्यक आहे. पेटीएम, फोनपे आणि गुगल पे सारखे अनेक डिजिटल पेमेंट ॲप्स आहेत, ज्याद्वारे पैसे हस्तांतरित केले जाऊ शकतात. या ॲप्समध्ये युनिक युपीआय आयडी किंवा व्हर्च्युअल पेमेंट ॲड्रेस (व्हीपीए) आहे जो पेमेंट ट्रान्सफरसाठी आवश्यक आहे.

**फोनपेमध्ये युपीआय आयडी कसा शोधायचा?**

युपीआय व्यवहारांसाठी फोनपे हे ॲप वापरणाऱ्यांची संख्या मोठी आहे. फोन पेमध्ये युपीआय आयडी शोधण्याचा मार्ग अगदी सोपा आहे. सर्वप्रथम तुमच्या फोनवर फोन पे ॲप उघडा. आता स्क्रीनच्या वरच्या डाव्या कोपऱ्यात तुमच्या प्रोफाइल पिक्चरवर टॅप करा. आता युपीआय सेटिंग्ज वर क्लिक करा, आता तुम्हाला तुमच्या बँक खात्याशी संबंधित युपीआयआयडी दिसेल.

**पेटीएम ॲपमध्ये युपीआय आयडी कसा शोधायचा?**

सर्वप्रथम तुमच्या फोनवर पेटीएम ॲप उघडा. आता स्क्रीनच्या वरच्या डाव्या कोपऱ्यात दिसणाऱ्या प्रोफाइल पिक्चरवर क्लिक करा आता तुम्हाला तुमच्या क्यूआर कोडच्या वर युपीआय आयडी दिसेल.

**गुगलपेमध्ये युपीआय आयडी कसा शोधायचा?**

सर्वप्रथम स्मार्टफोनवर गुगलपे ॲप उघडा. आता ॲपच्या वरच्या उजव्या कोपर्यात तुमच्या प्रोफाइल पिक्चरवर टॅप करा. आता तुमचा युपीआय आयडी जाणून घेण्यासाठी बँक खाते निवडा तुम्हाला ‘युपीआय आयडी’ सेक्शनमध्ये आपला आयडी दिसेल.




# उच्च रक्तदाब ठरतो सायलेंट किलर

वर्ल्ड हायपरटेन्शन लीगच्या वतीने दरवर्षी १७ मे हा दिवस जागतिक उच्च रक्तदाब दिन म्हणून पाळता जातो. आपल्या




रक्तवाहिन्यांमधून वेगाने रक्त पुढे जाताना रक्तवाहिन्यांच्या आवरणावर पडणारा दाब म्हणजे रक्तदाब होय. या आजाराविषयीचे दुष्परिणाम लक्षात घेता या आजाराविषयी जागरुकता निर्माण करण्यासाठी जागतिक उच्च रक्तदाब दिन म्हणून पाळला जातो.

शरीरात स्निग्ध पदार्थ वाढले की ते हातापायांच्या लहानलहान रक्तवाहिन्यांच्या भिंतींलगत जमा होतात. त्यामुळे रक्तप्रवाहाला अडथळा निर्माण होतो आणि रक्तदाब वाढतो. यास रक्तदाब विकार म्हणतात. हा विकार होण्यास खालील गोष्टी कारणीभूत ठरतात. उच्च रक्तदाब हा विकार कोणतेही लक्षण प्रकट न करता शरीरात कधी निर्माण होतो हे कळत नसल्याने याला सायलेंट किलर असे संबोधले जाते. सर्वात मोठी समस्या म्हणजे आपल्याला उच्च रक्तदाब आहे, याची कल्पनाच अनेकांना नसते.

धावपळीची जीवनशैली, कामाचे वाढलेले तास, धूम्रपानाच्या जोडीला मद्यपान आणि आरोग्याला अपायकारक ठरणाऱ्या खाण्याच्या सवयींमुळे अनेक तरुण-तरुणी


### निमित्त

उच्च रक्तदाबाच्या समस्येला बळी पडतात. हा आजार अन्य गंभीर आजारांना आमंत्रण देऊ शकतो. त्यामुळे या आजाराची वेळीच माहिती करून घेणे आणि तणावमुक्त स्वस्थ जीवनमान आत्मसात करणे अत्यावश्यक बनले आहे.

निष्क्रियता, लठ्ठपणा, व्यायामाचा अभाव, सिगारेट, तंबाखू, दारूचे व्यसन, अति मानसिक ताण, आहारात मिठाचे प्रमाण अधिक , अनुवंशिक कारणे, जसे मधुमेह, थॉयराईड, किडनीचे विकार यामुळे उच्चरक्तदाबाचा त्रास संभवू शकतो.

अंधुक दिसणे, वारंवार चिडचिड होणे, थकवा जाणवणे, चक्कर येणे, नाकातून रक्त येणे, धाप लागणे, छातीत कळ येणे, वारंवार डोके दुखणे, डोके जड होणे अशी लक्षणे आढळतात.


रक्तदाब नियंत्रणात आणण्यासाठी नियमित पोहणे, योगासने, प्राणायाम, व्यायाम याचा उपयोग होतो. मिठाचे आहारातील प्रमाण कमी करण्यानेही दाब नियंत्रणात राहतो. खसखस आणि टरबुजाच्या बियांचा गर वेगवेगळा वाटून समप्रमाणात मिसळून ठेवून सकाळ संध्याकाळ रिकाम्या पोटी खाल्याने वाढलेला रक्तदाब कमी होतो व रात्री झोपसुद्धा चांगली लागते. एक चमचा मेथीच्या दाण्याचे चूर्ण आठवडाभर सकाळ संध्याकाळ रिकाम्या पोटी घेतल्यास उच्च रक्तदाब कमी होतो. मनुकांसोबत लसुणाची पाकळी खाल्याने आराम येतो. तुळशीची चार पाने, लिंबाची दोन पाने व दोन चमचे पाणी घेऊन एकत्र वाटून. रिकाम्यापोटी घेतल्याने उच्च रक्तदाब कमी होतो. रक्तदाब नियंत्रित ठेवणे गरजेचे आहे. त्यासाठी डॉक्टरांच्या सल्ल्याने औषधे घ्यावी लागतात. रक्तदाबाची औषधे एकदा सुरू केल्यास ती मनाने बंद करता येत नाहीत. रक्तदाबाची वारंवार तपासणी करून औषधाची मात्रा ठरवावी लागते.



**क्लिक...क्लिक...!**

**रत्नागिरी : दिवसभर उन्हाच्या तडाख्यात घाम गाळल्यानंतर सायंकाळी परमेश्वराचा सहवास आणि निसर्गाचे सान्निध्य अशा ठिकाणी मनाला आत्मिक शांती लाभते.**

## आरोग्य प्रहर



### मासे खाल्याने वाढते मेंदूची कार्यक्षमता

माशांचे सेवन आपल्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर ठरू शकते. याशिवाय माशांमध्ये इतर अनेक प्रकारची पोषक तत्त्वे आढळतात. जाणून घेऊया नियमितपणे मासे खाण्याचे कोणते फायदे आहेत. मासे खाणे आपल्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. वास्तविक, माशांमध्ये ओमेगा-३ फॅटी ॲसिड असते, जे आपले शरीर तयार करू शकत नाही. अशा परिस्थितीत काही विशिष्ट अन्नपदार्थांच्या सेवनाने शरीरातील याची कमतरता भरून काढता येते.

माशांमध्ये ओमेगा ३ फॅटी ॲसिड भरपूर असते. त्यामुळे त्याचे सेवन आपल्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर ठरू शकते. याशिवाय माशांमध्ये इतर अनेक प्रकारची पोषक तत्वे आढळतात. जाणून घेऊया नियमितपणे मासे खाण्याचे कोणते फायदे आहेत.

१. माशांमध्ये असलेले ओमेगा-३ फॅटी ॲसिड आणि व्हिटॅमिन ई हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर असल्याचे ओळखले जाते. तथापि, जास्त प्रमाणात टाळून त्यांचे सेवन करू नये.

२. मासे खाल्ल्याने तुमचा मेंदू मजबूत होतो. यामध्ये असलेले प्रोटीन नवीन पेशींच्या निर्मितीमध्ये मदत करते, ज्यामुळे तुमचा मेंदू तीक्ष्ण होतो. सोबतच यामध्ये असलेले फॅटी ॲसिड स्मरणशक्ती सुधारण्यास मदत करते.

३. ओमेगा-३ फॅटी ॲसिडने समृद्ध मासे खाल्ल्याने कर्करोगाच्या पेशी वाढण्यापासून रोखता येतात. हे तुम्हाला कॅन्सरपासून बचाव करण्यास मदत करते.

४. त्वचेवर फिश ऑइल लावल्याने त्वचेच्या सुरकुत्या कमी होतात. त्याच वेळी, माशांचे नियमित सेवन केल्याने वृद्धत्वाची लक्षणे कमी होण्यास मदत होते.

५. मासे खाल्ल्याने तुम्ही भावनिकदृष्ट्या मजबूत बनता. ज्यामुळे नैराश्य, तणाव, चिंता विकार कमी होऊ शकतात.

६. केसांच्या समस्या दूर करण्यासाठीही मास्यांचे सेवन खूप फायदेशीर मानले जाते. यामुळे टाळूपासून केसांच्या मुळांपर्यंतच्या समस्या कमी होऊ शकतात.

# खोपोलीतील गटारे, नाले तुंबलेल्या अवस्थेत

## ▪ नगर परिषद प्रशासनाचे दुर्लक्ष

**खालापूर : प्रतिनिधी**

पावसाळा काही दिवसांवर येऊन ठेपला आहे. मात्र खोपोली नगर परिषद प्रशासन पावसाळ्यापुर्वीची नालेसफाई व वार्डातील साफसफाई करण्यास असमर्थ ठरले आहे. त्यामुळे येत्या पावसाळ्यात खोपोलीतील सखल भागात पाणी तुंबण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

खोपोलीत अत्यावश्यक सेवेबरोबरच मान्सूनपुर्व कामांकडे नगर परिषद प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. प्लॉस्टिक बाटल्या, झाडे-झुडपे, कचरा यांनी खोपोलीतील नाले, गटारे तुंबली असून, प्रत्येक प्रभागात दुर्गंधी पसरली आहे. शहरातील विणानगर, वैभवनगर व परिसरातील सखल भागात पावसाळ्यात नेहमीच पावसाचे पाणी साठून रहिवाशांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. यावर्षीही हीच परिस्थिती निर्माण होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. मान्सूनपुर्व कामांकडे दुर्लक्ष होत असल्याने नागरिक नगर परिषद प्रशासनाच्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त करीत आहेत.


(छाया : अरुण नलावडे)

> **खोपोलीतील नालेसफाई व मान्सूनपूर्व कामे येत्या काही दिवसांत युद्धपातळीवर हाती घेण्यात येतील.**
> **-अनूप दुरे, मुख्याधिकारी, खोपोली नगर परिषद**

# खालापुरात अनेक पक्ष्यांच्या प्रजाती बेघर

## ▪ बेसुमार वृक्षतोडीचा परिणाम

**खोपोली : प्रतिनिधी**

विकासाच्या नावाखाली खालापूर तालुक्यात बेसुमार वृक्षतोड झाली असून, वनसंपदेबरोबर वन्यजीव संपदेवरदेखील घाला घातला आहे.

खालापूर तालुक्यातून राज्यमार्ग, राष्ट्रीय महामार्ग आणि मुंबई-पूणे द्रूतगती महामार्ग जातो. पाली-खोपोली, पेण-खोपोली, पळसदरी-कर्जत या राज्यमार्गाच्या रुंदिकरणाचे काम अंतिम टप्प्यात आहे. मुंबई-पूणे राष्ट्रीय महामार्गावर खालापूर ते खोपोली रुंदिकरणाचे कामदेखील झाले आहे. याशिवाय द्रूतगती महामार्गासाठी अधिकच्या मार्गिकेचे काम, घाटमार्गे सुरू आहे. या सर्व कामात बळी मात्र वृक्षांचा जात असून शंभर वर्षाचे वृक्षदेखील काही मिनिटांत कटरने आडवे झाले आहेत. त्यामुळे या वृक्षावर वर्षानुवर्ष वास्तव्य करून असलेल्या पक्ष्यांना मात्र हक्काचा निवारा गमवावा लागला आहे. खालापूरात ठेकेदाराच्या निर्दयीपणामुळे पोपट आणि पिल्लांचा मृत्यू झाल्यानंतर पक्षी, प्राणी मित्रांचा संताप अनावर झाला होता. डोळ्यादेखत तडफडून झालेल्या पोपटांचा मृत्यूनंतरही ठेकेदाराचे काम सुरू असल्याने निर्दयीपणाचा कळस झाला होता.


(छाया : विनायक माडपे)

पाली-खोपोली मार्गावरदेखील तशीच परिस्थिती असून महाकाय वृक्षांच्या कत्तलीमुळे वन्यजीवांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. दुर्दैवाची बाब म्हणजे प्रशासनदेखील तोडणाऱ्या वृक्षांच्या बदल्यात अनामत ठेव घेवून मोकळे होत असून, त्यावर वास्तव्य असलेल्या जिवांचे मोल, संगोपनबाबत उदासीन आहे. वृक्षतोड करण्यापूर्वी या मुक्या जिवांचा विचार व्हावा, अशी पक्षीमित्रांची अपेक्षा आहे.

खालापूर ते खोपोली परिसरात सुमारे साडेतीनशे झाडे तोडण्यात आली आहेत. खालापूर नगरपंचायतीने १२९ वृक्ष तोडण्याची परवानगी देताना ठेकेदाराला एक वृक्षाच्या बदल्यात पाच वृक्ष लावण्याचे आदेश दिले होते. तर खोपोली नगर परिषदेने २१२ वृक्षतोडीला परवानगी देताना १०६० नवीन वृक्ष लागवडीचे बंधन ठेकेदाराला घातले आहे. शिवाय एका झाडामागे पाच हजार रूपये अनामत रक्कम घेतली आहे. मात्र पक्ष्याच्या अधिवासांचे काय? याबाबत स्पष्टता नाही.

वीस वर्षापासून खालापूर तालुक्यात हजारो झाडांवर केवळ रस्त्यासाठी कुऱ्हाड चालवली गेली आहे. खालापुरातून द्रूतगती मार्गाला जोड रस्ता देताना दिडशेपेक्षा अधिक मोठी झाडे तोडण्यात आली होती. याशिवाय द्रूतगती मार्गावर तर गणतीच नव्हती. कारण हा रस्ता डोंगर आणि टेकडी आणि निसर्गसंपदा असलेल्या भागातून गेला आहे. येत्या दोन वर्षात रस्त्याच्या कामात खालापूर हद्दीतील पाच हजारपेक्षा जास्त झाडे भुईसपाट होणार आहेत.

> **निसर्गाच्या साखळीतील महत्त्वाचा घटक पक्षी आणि प्राणी आहे. वृक्ष लागवडीपुरता विचार करताना बेघर होणाऱ्या पक्ष्यांना अधिवास मिळणे आवश्यक आहे.**
> **-योगेश शिंदे, पक्षी-प्राणीमित्र, खालापूर**

# नेरळमध्ये मुलांसाठी आध्यात्मिक बालसंस्कार शिबिर

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील नेरळ येथील श्री संत ज्ञानोबा तुकोबा वारकरी शिक्षण संस्थेच्या वतीने लहान मुलांसाठी आध्यात्मिक बालसंस्कार शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिराचे उद्घाटन नेरळच्या सरपंच उषा पारधी आणि कृष्णा पारधी यांच्या हस्ते करण्यात आले. उपसरपंच मंगेश म्हसकर यांनी वीणा पूजन आणि ग्रंथराज ज्ञानेश्वरी पूजन केले.

नेरळ येथील श्री संत ज्ञानोबा तुकोबा वारकरी शिक्षण संस्थेतर्फे कैलाश महाराज भोईर हे दरवर्षी बालसंस्कार शिबिर आयोजित करीत असतात. या अध्यात्मिक बालसंस्कार शिबिरात गीता वाचन, पखवाज वादन, प्रवचन, हरिपाठ, कीर्तन, वारकरी भजन गायन, समाज प्रबोधन आणि वैदिक शिष्टाचार या विषयावर ज्ञान दिले जाते.


संत ज्ञानोबा, तुकोबा वारकरी शिक्षण संस्थेचा उपक्रम
(छाया : संतोष पेरणे)


संस्थेच्या नेरळ मोहाचीवाडी येथील सभागृहात आयोजित केलेल्या या १५ दिवशीय बालसंस्कार शिबिरात कर्जत, खालापूर, अंबरनाथ आणि मुरबाड तालुक्यातील इयत्ता पाचवी ते दहावीमधील ५०हून अधिक मुले सहभागी झाली आहेत. त्यांना हभप कैलाश महाराज भोईर यांच्या मार्गदर्शनाखाली देवाची आळंदी येथील पखवाज वादक संगीत विशारद भगवान महाराज पांचाळ आणि संगीत विशारद निलेश म्हसकर मार्गदर्शन करणार आहेत.

या अध्यात्मिक बालसंस्कार शिबिराच्या उद्घाटन सोहळ्याला हभप पंढरीनाथ तांबोळी, मनोहर महाराज हिलाल, मारुती दुर्गे, जनार्दन थोरवे, गुरुनाथ शिंगटे, जैतु महाराज शेळके, लहू महाराज शेळके, जनार्दन थोरवे, विष्णू महाराज शेळके, बाळाराम मसने, काशिनाथ मसने, बळीराम कराळे, गजानन कोळंबे, हरिभाऊ महाराज पारधी, कल्पना हिलाल, कांता राऊत, सरस्वती पाटील, ज्योती मते आणि बाळू हिलाल आदी उपस्थित होते.

# शेडवली येथील रोपांचे श्रीसदस्यांकडून संगोपन

**खोपोली : प्रतिनिधी**

डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानतर्फे पद्मश्री अप्पासाहेब धर्माधिकारी आणि सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शाखाली श्रीसदस्यांनी खालापूर तालुक्यातील शेडवली येथील लागवड केलेल्या झाडांची देखभाल, जोपासना केली.



श्रीसदस्यांनी पद्मश्री अप्पासाहेब धर्माधिकारी आणि सचिनदादा धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शाखाली जुलै २०२१मध्ये शेडवली येथील वनविभागाच्या जागेत वड, पिंपळ, ऐन, जांभूळ, चिंच अशा विविध औषधी आणि बहुगुणी रोपांची लागवड केली होती.

वनविभागाचे तत्कालीन वनाधिकारी आशिष पाटील यांच्या सहकार्याने वृक्षारोपणासाठी शेडवली येथे जागा उपलब्ध करण्यात आली होती. श्रीसदस्यांनी त्या जागेत खड्डे खोदून खत टाकल्यानंतर सुमारे तीनशे रोपांची लागवड केली होती. खालापूर तालुक्यातील श्रीसदस्य दर गुरुवार, रविवार तसेच वेळ मिळेल तेव्हा वृक्ष लागवड ठिकाणी पाणी देणे, निरुपयोगी तण, वेली काढून लागवड केलेल्या झाडांना खत देत मशागतीचे काम करतात.

# रोह्यात वृक्षारोपण, ज्येष्ठ महिलांना चादर वाटप


(छाया : जितेंद्र जाधव)

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील रोठ बुद्रूक ग्रामपंचायतीच्या विद्यमान सदस्या वैभवी राजेश भगत याच्या वाढदिवसाचे औचित्य साधून ग्रामसचिवालयातील कार्यशाळेत अनेक ज्येष्ठ महिलांना सोलापुरी चादरी भेट म्हणून देण्यात आल्या. तसेच कार्यशाळेत सहभागी झालेल्या प्रत्येक महिलेला मोगऱ्याच्या फुलांचे रोपटे देण्यात आले. ग्रामपंचायत कार्यालयाच्या आवारात वृक्षारोपणही करण्यात आले. या वेळी अनेक महिलांनी वैभवी भगत यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

सरपंच नितिन वारंगे, भाजप युवा मोर्चाचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष तथा ग्रामपंचायत सदस्य अमित घाग, उपसरपंच वेदिका डाके, समिर शेडगे, युवा मोर्चाचे तालुका अध्यक्ष राजेश डाके, निलेश वारंगे, शशिकांत साळूंके, यशंवत गोसावी, सागर डाके, रितेश घाग, समिर वारंगे, श्रीकांत दरडे, अमोल गंधाले, दक्षिण रायगड भाजप महिला मोर्चा चिटणीस श्रद्धा घाग, सुप्रिया वांगे, समृद्धी वांगे, अमृता साळूंके, रोहिणी गोसावी, दिपीका डाके, पुनम गंधाले, सोनाली भगत, ज्योती सिन्हा, सपना वारंगे, वैशाली मोरे यांच्यासह अनेक महिला या वेळी उपस्थित होत्या.

# महाडमध्ये विवाहित महिलेची आत्महत्या

**महाड : प्रतिनिधी**

येथील दादली पुलावरुन सावित्री नदीपात्रात उडी मारुन एका तरुण विवाहीत महिलेने आत्महत्या केली. तब्बल ३८ तासांनी मृतदेह शोधण्यात यश आले.

महाड शहर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार महाडमधील प्रभात कॉलनी येथील शुभांगी अजय शिंदे (वय ३५) हिने कामाला जाते असे सांगून घरातून बाहेर पडून थेट दादली पुलावर जाऊन सावित्रीच्या पात्रात उडी मारुन आत्महत्या केली. त्यावेळी तेथे असलेल्या काही नागरिकांनी तात्काळ पोलिसांना बोलवून शोधमोहीम सुरू केली. साळूंके रेस्कु टीम आणि पोलिसांच्या दोन तुकड्या दोन बोटीतून सदर महिलेचा शोध घेत होत्या. सोमवारी सकाळी १० वाजता नदीपात्रात सदर महिलेचा मृतदेह शोधण्यात यश आले.

या प्रकरणी महिलेचा पती अजय हरी शिंदे यांनी दिलेल्या खबरीनुसार महाड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# रोह्याच्या सार्वजनिक गणेशोत्सव ट्रस्टच्या अध्यक्षपदी चंद्रकांत पार्टे यांची निवड

**रोहे : प्रतिनिधी**

एक गाव एक गणेशोत्सव ही संकल्पना गेली १०० वर्षे प्रयत्नपूर्वक जतन करणाऱ्या रोह्याच्या सार्वजनिक गणेशोत्सव ट्रस्टच्या अध्यक्षपदी चंद्रकात पार्टे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.


(छाया : महादेव सरसंबे)

रोह्याच्या सार्वजनिक गणेशोत्सव ट्रस्टची नवीन कार्यकारिणी निवडण्यासाठी रविवारी (दि. १५) मावळते अध्यक्ष राजेश काफरे यांच्या अध्यक्षतेखाली ट्रस्टच्या सदानिकेत आजी माजी विश्वस्तांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत पुढील तीन वर्षांसाठी ट्रस्टची नवीन कार्यकारिणी गठीत करण्यात आली त्यामध्ये अमेय जोशी (उपाध्यक्ष), हर्षद भाटे (कार्यवाह), प्रीतम देशमुख (सहकार्यवाह)आणि भारत वाकचौरे (खजिनदार) यांचा समावेश आहे.

ट्रस्टचे माजी अध्यक्ष अविनाश दाते, अमित उकडे, निलेश शिर्के, किशोर तावडे उपस्थित होते. त्यांनी नवीन कमिटीला शुभेच्छा देऊन मार्गदर्शन केले.

ट्रस्टच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल चंद्रकात पार्टे यांचे माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, माजी नगरसेवक अहमद दर्जी, महेंद्र गुजर, अमित उकडे आदींसह अनेक मान्यवरांनी अभिनंदन केले.

# उन्हाचे वाढते चटके विषयावर होणार विचारमंथन

**कर्जत : संतोष पेरणे**

मागील काही वर्षात उन्हाचे चटके सर्वांना असह्य झाले आहेत. कधी नव्हे तो पारा चाळीशी पार करून पुढे जात असून सूर्यनारायण आग ओकत आहे. अशावेळी या विषयावर काम करणाऱ्या उमाई खोरे संजीवनी अभियान आणि सगुणा रूरल फाउंडेशनने एकत्र काम करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी नेरळजवळील सगुणा बागेमध्ये १७ आणि १८ मे रोजी अश्वमेध प्रतिष्ठानचे अविनाश हरड आणि सगुणा रूरल फाउंडेशनचे पदाधिकारी उमाई खोरे संजीवनी अभियानासोबत एकत्र येणार आहेत.

उल्हास नदी उर्फ उमाई मुख्यतः पुणे, रायगड व ठाणे या जिल्ह्यांमधून वाहते व वसईच्या खाडीला जाऊन मिळते. या तीन जिल्ह्यांमध्ये असलेले उमाईचे खोरे अंदाजे चार हजार चौरस किमी आहे. ५० लाखापेक्षा जास्त नागरिक उल्हास नदीचे पाणी पिण्यासाठी आणि त्या पाण्याचा वापर भाजीचे मळे आणि अन्य व्यवसायांसाठी करतात. त्यामुळे हा जलस्त्रोत सातत्यपूर्वक व शाश्वतपणे वाहत राहणे अत्यंत महत्वाचे आहे. त्यामुळे हे क्रमप्राप्त आहे की, या जलस्त्रोता भोवतालचा परिसर नैसर्गिक दृष्ट्या वैविध्यपूर्ण व सशक्त असणे अत्यावश्यक आहे.

यावर्षी आतापर्यंत येथील अंदाजे ९० टक्के परिसराच्या प्रत्येक किलोमीटरमध्ये वणवा लागून गेला आहे. हे प्रमाण गेल्या ५-१० वर्षात अगोदरपेक्षा अंदाजे २० टक्क्यांनी वाढले आहे. वणवा पेटवून देणाऱ्या लोकांचा हा मानसिक आजार खूप वाढला आहे आणि सभोवतालचा शुष्क होत जाणारा परिसर त्यात भरच घालत आहे. मातीची धूप याविषयाची भयानकता सातत्यपूर्वक वाढत असूनसुद्धा त्याचे कोणालाच सोयरसुतक पडले नाही, असे भासते. या धुपेची मोजदाद करण्यासाठी चर्चा, जागृती करण्याचे प्रयत्न सुरु व्हायला हवेत. परिसरातील जंगल, वने आणि डोंगर उजाड होण्याची प्रक्रिया वेग पकडत आहे. जैवविविधतेच्या अन्न साखळीमधील गवत आणि पालापाचोळा दरवर्षी जळून खाक होत आहे. त्यामुळे लाखो हेक्टर जमिनी भकास होताना दिसत आहेत. या परिसरातील शेतजमिनी पाहताना मन उदासीन व विषण्ण होते. शेतकरी चिंतेने ग्रासला आहे. उत्पादकता घटली आहे. जमिनी शुष्क होऊन भूजल पातळी कमालीची घटली आहे. तसेच जागतिक तापमानवाढ व हवामान बदलाच्या भोवऱ्यात शेतकरी गुरफटत आहे. हे सर्व या जमिनीतील सेंद्रिय कर्ब कमी होणे या एकमेव कारणामुळे घडले आहे. मात्र हे सत्य झाकून ठेवून किंवा दुर्लक्ष करून सेंद्रिय शेतीचा भाबडा प्रचार जोर धरत आहे. या सर्व प्रक्रियेमध्ये भूमातेचा खरा खंदा कार्यकर्ता (ग्रामीण तरुणाई) नामोहरम आणि निराश होताना दिसत आहे.

उल्हास नदीखोऱ्यात पडणारे पावसाचे पाणी जास्तीत जास्त प्रमाणात जमिनीत झिरपून किंवा डोंगरांच्या पोटात साठून राहिले पाहिजे व ते हळूहळू जमिनीखालून झिरपून नदीमध्ये आले पाहिजे. या प्रक्रियेमुळे जलस्त्रोत जिवंत राहून नदी शाश्वतपणे वाहत राहू शकेल. आज काल पावसाळा संपल्यानंतर ६०-७० दिवसांमध्येच कोरडे होणारे प्रवाह पूर्वीप्रमाणे १२०-१५० दिवस पाण्याने वाहते करणे अजूनही शक्य आहे. पाणी जमिनीत झिरपले नाही तर काय होते, हे आपल्या सर्वांना माहिती आहेच. डोंगर उताराप्रमाणे वाहत्या पाण्याचा वाढता वेग तेथील निसर्गाला जास्तीत जास्त हानी पोचवत राहतो. त्यावेळी निसर्गाने शेकडोवर्षे खर्च करून तयार केलेली वरच्या थरातील शेकडो टन माती वाहून जाते. तसेच गवत, स्थानिक वनस्पती यांची पडलेली बीजे वाहून जातात. या सर्वामुळे खडक उघडे पडून तेथील गवत वाढण्याची क्षमता झपाट्याने कमी होत आहे. या दुष्टचक्रामुळे पाणी डोंगरामध्ये न झिरपणे व जैवविविधतेची अन्नसाखळी नष्ट होत आहे. या सर्व दुष्टचक्राचा एक नंबर शत्रू म्हणजे वणवा होय. ते थांबण्यासाठी युद्धपातळीवर काम होणे गरजेचे आहे.

उल्हास नदी खोऱ्यातील सर्व शेतजमिनी एसआरटी शून्य मशागत पद्धतीखाली आणल्यास त्या जमिनीतील कर्बाचे प्रमाण वाढून शेतकरी व भूमाता आनंदी होतीलच पण त्याचबरोबर हजारो हेक्टर जमिनीमध्ये पाणी झिरपण्याची प्रक्रिया सुरु होऊ शकते.

कृषिरत्न शेतकरी शेखर भडसावळे यांनी शोधून काढलेली लागवडीची एसआरटी पद्धत आणि जंगलात लागणारे वणवे रोखण्यासाठी यशस्वी ठरत असलेली सगुणा वनसंवर्धन समिती ही आयुधे आता सरकारच्यादेखील हातात आहेत. तर नद्यांना जलपर्णीमुक्त करण्याचे काम करणाऱ्या सगुणा रूरल फाउंडेशनकडून उन्हाच्या वाढत्या चटक्यांवर प्रबोधनातून जनजागृती आणि ते चटके कमी करण्यासाठी उचललेली पावले हा महत्त्वाचा टप्पा ठरणार आहे. त्यासाठी नेरळ जवळील सगुणा बागेमध्ये या क्षेत्रात काम करणारे कार्यकर्ते विचारमंथन करणार आहेत.


**जाहीर पेपर नोटीस** (प्रतिवादी क्र. १ करीता)

**मा. न्यायाधिश, सहकारी न्यायालय, रायगड, रत्नागिरी, मु. अलिबाग यांचे न्यायालयात**
**(रायगड, रत्नागिरी जिल्हा)**

**मुकादमा क्रमांक/सी.सी./आर.जी.डी./२५/२०२२**

**कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल** — **वादी**
पत्ता : ६२६अे/७बी, श्रीकृष्ण निवास, रामदास मारूती मंदिराजवळ टिळक रोड, पनवेल, रायगड ४१० २०६.

**विरूद्ध**

**१) श्री. संतोष महादेव चौगुळे**
रा. पळस्पे, रुम नं. १०२, पहिला मजला,
नॅशनल पार्क, पो-पळस्पे,
ता-पनवेल, जि-रायगड. ४१०२०६

**२) श्री. सोपान राजाराम जाधव**
रा. कावेरी को.ऑप.हौ. सोसायटी,
आसुडगाव, खांदा कॉलनी,
ता-पनवेल, जि-रायगड. ४१०२२१

**३) श्री. अरूण बाबू कातरे**
रा. सिमरन पार्क, बी-३०२, प्लॉट नं. ९९/१००,
सेक्टर-८, नवीन पनवेल,
ता. पनवेल, जि. रायगड. ४१०२०६

— **प्रतिवादी**

**दावा रुपये ९,०६,५१२/-**

ज्या अर्थी उपनिर्दिष्ट वादी यांनी दावा या न्यायालयात दाखल केला आहे. त्या अर्थी आपण आपली बाजू मांडण्यासाठी दि. ०६/०६/२०२२ रोजी सकाळी/दुपारी ठिक ११.०० वाजता स्वत: जातीने सदर दाव्याबाबतीतील कागदपत्रासह हजर रहावे.

या नोटीसीअन्वये आपणास असे कळविण्यांत येते की, वर नमूद केलेल्या दिवशी व वेळी आपण हजर राहण्यास कसूर केल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याची सुनावणी केली जाऊन त्याचा निर्णय केला जाईल.

त्याचप्रमाणे अशीही नोटीस देण्यात येते की, वर नमूद केलेल्या तारखेस अगर तत्पूर्वी सदर दाव्यातील हुकुमाची बजावणी करण्यासाठी आपला संपूर्ण पत्ता दाखल करण्यात कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. ०७/०४/२०२२ रोजी माझी सही व न्यायालयाची मुद्रा यासह दिले.

कोर्टाचा पत्ता : सहकार न्यायालय रायगड-रत्नागिरी, सहकार भवन
(रा.जि.प्रा. शिक्षक सह. पतसंस्था मर्या., अलिबाग कॅम्पस) दुसरा मजला, ब्राह्मण आळी, अलिबाग, एस.टी. स्टँडसमोर, मु.पो.ता. अलिबाग, जि. रायगड-४०२२०१.

सोबत लवाद दावा पाने

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**ज्युडिशियल क्लार्क**
**रायगड जिल्हा सहकारी न्यायालय, मु. अलिबाग**
**रायगड व रत्नागिरी जिल्हा**

# पनवेलमधील कुष्ठरुग्णांचे पुनर्वसन करा

## ‘पीएमएवाय’चा लाभ मिळवून देण्याची नगरसेवक भुजबळ यांची मागणी

**पनवेल : प्रतिनिधी**

रोग झाला म्हणून गावातून हाकलले. तेव्हापासून इथेच राहतोय, पण आता रेल्वेचे नवीन काम सुरू झाले, म्हणून इथून जायच्या नोटिसा दिल्यात आम्ही आता जायचे कोठे, आम्हाला इथेच जागा द्या, असा आक्रोश तेथील नागरिक करीत आहेत. त्यामुळे नगरसेवक अ‍ॅड. मनोज भुजबळ यांनी महापालिका आयुक्तांकडे पत्र देऊन कुष्ठरुग्ण व लोकमान्य वसाहतीतील कुटुंबांचे पीएमएवाय (प्रधानमंत्री आवास योजना) अंतर्गत पुनर्वसन करण्यासाठी मागणी केली आहे.



पनवेल, उरण तालुक्यातील समाजाने नाकारलेल्या कुष्ठरुग्णांची वसाहत त्यावेळी पनवेल शहरातील प्रभाग ९ मधील सर्व्हे न. ३८९ या स्मशांनासाठी राखीव असलेल्या भूखंडावर वसली आहे. पनवेल रेल्वे स्टेशनच्या फलाट क्रमांक १च्या बाजूला श्री गणेश कुष्ठरुग्ण वसाहत आहे. या वसाहतीत २४ कुटुंबे आहेत. अकुर्ली, वाघिले या भागातून आलेली ही कुटुंबे या ठिकाणी झोपड्या बांधून राहू लागली. त्यावेळी मालगाडीतून येणाऱ्या तांदुळाच्या पोत्यातील सांडलेले तांदूळ गोळा करून ते विकून त्यांची उपजीविका चालत, असे छबीबाई आंबेकर सांगतात.

पनवेल नगर परिषदेने त्यांना कालांतराने पाणी, शौचालय व विजेची सोय करून दिली. पिवळी रेशन कार्ड मिळाली संजय गांधी निराधार योजनेचा लाभ दिला आहे, पण महाराष्ट्र शासनाच्या झोपडपट्टी पुनर्वसन सन १९९५च्या योजनेत त्याची नावे समाविष्ट करण्यात आली नाहीत. समाजाने त्यांना लाथाडले होतेच पण सरकारने ही लाथाडले. जिल्हाधिकाऱ्यांनी फेर सर्व्हे करण्याचे आदेश दिले. आपल्याला घर मिळावे म्हणून त्यांनी सरकार दरबारी अनेक प्रयत्न केले. घर मिळण्याऐवजी सिडकोने त्यांना तेथून हटवण्याचा प्रयत्न केला.

पनवेल रेल्वेचे आशिया खंडातील मोठे जंक्शन होणार असल्याने त्याचा विकास करण्यासाठी पुन्हा त्यांना तेथून हलवण्यासाठी झोपड्यांवर नबर टाकून नोटीसा देण्यात आल्या आहेत. त्यांना येथून कल्याणला हलवण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. त्यांची मुले येथील शाळा व महाविद्यालयात शिक्षण घेत आहेत. काहीजण छोटे-मोठे उद्योग धंदे, नोकरी किंवा हमाली करून उपजीविका करीत आहेत, असे असताना आम्ही कोठे जायचे असा प्रश्न त्यांना पडला आहे. प्रथम आमची राहण्याची सोय करावी नंतर आमच्या झोपड्या पाडाव्यात, अशी मागणी संस्थेचे सचिव अशोक आंबेकर यांनी केली आहे.

**मालधक्का वसाहत रेल्वेच्या आणि लोकमान्य वसाहत सिडकोच्या जागेत आहेत यामध्ये मालधक्का वसाहतीत १६५ व लोकमान्य वसाहतीत ३० झोपड्या आहेत. सुमारे ४५ वर्षांपासून तेथे असल्याने पनवेलच्या जडण-घडणीत ही त्यांचाही वाटा आहे. त्यांना पाणी, वीज, शौचालय व प्राथमिक सुविधा नगर परिषदेनेच उपलब्ध करून दिल्या होत्या. पनवेल हे सर्वांत मोठे रेल्वे टर्मिनल म्हणून विकसित होत आहे. त्यामुळे यांचे पीएमएवाय अंतर्गत पुनर्वसन करावे, अशी मागणी पत्र देऊन महापालिका आयुक्तांकडे केली आहे.**

**-अ‍ॅड. मनोज भुजबळ, नगरसेवक**

**आम्ही ५० वर्षे येथे राहत आहोत. पनवेल, उरण तालुक्यातून आमच्या पालकांना कुष्ठरोग झाला म्हणून गावातून हाकलून लावले. मी लहानाचा मोठा इथेच झालो. माझी मुले येथील महाविद्यालयात शिकत आहेत. आमचा शासनाला विरोध नाही पण आम्हाला पनवेलमध्येच जागा मिळावी, अशी आमची मागणी आहे.**

**-अशोक आंबेकर, सचिव, श्री गणेश कुष्ठरोग वसाहत सेवा संस्था**

# पनवेलमध्ये कोसळलेले झाड बाजूला सारून रस्ता केला मोकळा

## नगरसेवक राजू सोनी यांची तत्परता

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महानगरपालिकेचे नगरसेवक राजू सोनी यांच्या तत्परतेमुळे मोठे वृक्ष रस्त्यावर पडून होणारी दुर्घटना टळली आहे. त्यांनी वेळीच अग्निशामक दलाला घटनास्थळी प्राचारण करून तो वृक्ष बाजूला काढला आहे.



पनवेल शहरातील प्रभाग क्र.१९मधील एमईसीबी कार्यालयासमोर असलेले मोठे झाड रविवारी (दि. १५) रात्री ८ वाजता अचानक मुख्य रस्त्यावर पडले. त्यामुळे काही काळ रस्ता बंद झाला होता. याची माहिती नगरसेवक राजू सोनी यांना येथील काही नागरिकांनी व व्यापाऱ्यांनी दिली. त्यांनी तत्काळ तेथे जाऊन पाहणी केली त्या ठिकाणी असलेल्या पोलिसांच्या मदतीने बॅरीगेट लावून तेथील वाहतूक थांबवली व याबाबतची माहिती नगरसेवक राजू सोनी यांनी पनवेल महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख, सभागृह नेते परेश ठाकूर, तसेच महानगरपालिकेतील संबधित अधिकाऱ्यांना कळविली.

या वेळी राजू सोनी यांच्या मदतीला कोळीवाड्यातील काही मुलेसुद्धा धावली. कोणतीही दुर्घटना होऊ नये यासाठी राजू सोनी तेथे उभेच राहून होते तसेच पनवेल महापालिकेचे अग्निशमन दलाचे अधिकारी अनिल जाधव यांच्याशी संपर्क साधून त्यांना व त्यांच्या पथकाला त्याठिकाणी बोलवले व पडलेले झाड बाजूला करण्यासाठी त्यांनी त्यांच्या यंत्रणाच्या सहाय्याने या झाडांच्या फांद्या कापून रस्त्याच्या बाजूला करून दिल्या. त्यानंतर महापालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांना बोलवून या फांद्या बाजूला करून संपूर्ण रस्त्यावर झाडून रस्ता स्वच्छ केला व वाहतुकीस मार्ग मोकळा केला. त्यामुळे येथील नागरिकांनी नगरसेवक राजू सोनी यांचे कौतुक व आभार मानले आहेत.

## निवडक

### सोमटणे येथे अनोळखी व्यक्तीचा मृत्यू

**पनवेल :** सोमटणे येथे बेशुद्धावस्थेत सापडून आलेल्या अनोळखी इसमाला उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले आहे. या व्यक्तीच्या नातेवाइकांचा शोध तालुका पोलीस घेत आहेत. या व्यक्तीचे नाव गोविंद नेपाळी असून वय अंदाजे पन्नास वर्षे आहे. याबाबत अधिक माहिती असल्यास त्यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक विवेक भोईर यांच्याशी संपर्क साधावा.

### चिखले येथे एकाचा मृतदेह आढळला

**पनवेल :** पनवेल-पुणे जुन्या हायवेवरील चिखले बस स्टॉपजवळ पनवेल तालुका पोलिसांना ५० ते ५५ अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळला आहे. या व्यक्तीच्या नातेवाइकांचा शोध तालुका पोलीस घेत आहेत. त्याचा रंग सावळा, डोक्याचे केस काळे, पांढरे वाढलेले आहेत. त्याची उंची १६५ सेंटिमीटर असून अंगात पांढरा शर्ट व निळी पॅन्ट घातलेली आहे. याबाबत अधिक माहिती असल्यास त्यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक विवेक भोईर यांच्याशी संपर्क साधावा.

### विवेक वारभुवनला झुंजार वक्ता पुरस्कार

**नवी मुंबई :** सिन्नर येथील झुंजार लाइव्ह आणि आई सेवा फाउंडेशन आयोजित राज्य स्तरावरील वक्तृत्व स्पर्धेत नवी मुंबईतील विवेक मधुकर वारभुवनने प्रथम क्रमांक पटकावून या स्पर्धेतील पहिला झुंजार युवा वक्ता म्हणून मान पटकावला आहे. ११ हजार रुपये रोख, सन्मान चिन्ह आणि प्रशस्तीपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. सिन्नरमधील विविध मान्यवरांच्या उपस्थितीत आणि हस्ते हा पुरस्कार वितरित करण्यात आला. या पूर्वी विवेक याने अनेक राज्य स्तरीय व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत पारितोषिके जिंकली आहेत.



# उरणमध्ये अँटी करप्शन आणि क्राइम कंट्रोल क्लबची सभा

**उरण : वार्ताहर, बातमीदार**

तालुक्यातील भेंडखळ येथे रविवारी (दि. १५) अँटी करप्शन आणि क्राइम कंट्रोल क्लबची सभा झाली. महाराष्ट्र अध्यक्ष सागर ठाकूर यांच्या अध्यक्षते खाली ही सभा झाली.



समाजामध्ये अनेक ठिकाणी अनधिकृत पार्किंग, अनधिकृत प्रवासी वाहतूक त्याचबरोबर बेकायदेशीर जमीन विक्रीतून शेतकऱ्यांची होणारी घोर फसवणूक अशा विषयांवर या वेळी चर्चा झाली. तर एक सामाजिक बांधिलकी म्हणून वारकऱ्यांसाठी छोटेखानी कार्यक्रम करण्याच्या सूचना सर्व सदस्यांना देण्यात आल्या. समाजात चांगले कार्य करून जास्तीत जास्त गरजूंना मदत करण्याच्या सूचना सुद्धा देण्यात आल्या.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक उरण तालुका अध्यक्ष विजय भोईर यांनी केले. तर या कार्यक्रमाच्या वेळी लिलेश्वर ठाकूर, किरण पाटील, दीपक भोईर, सतीश सोनलकर (सातारा), मनीषा खरात (उलवे नोड), अंबरनाथ विभागीय अध्यक्ष मनोहर पाटील, सदस्य उमेश साळुंखे, सदस्य चंदन मढवी, सदस्य किरण पाटील, सदस्य अशोक जाधव, सदस्य शशिकांत इटम (पालघर) आदी सहकारी उपस्थित होते.

शेवटी सर्वांनी समाजामध्ये होणारी कोणतीही बेकायदेशीर घटना माहीत असताना लपवून न ठेवण्याचे आवाहन महाराष्ट्र अध्यक्ष सागर ठाकूर यांनी उपस्थित सर्वांना केले. अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी नागरिकांनी या संस्थेत सहभागी व्हावे असे आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी मनिषा खरात (७२१९०२३६८७), विजय भोईर (९८१९८३६८२०), सागर ठाकूर (९८९२७ ७०२४६) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले.

# मनोज पाटील यांना पुरस्कार

**उरण : बातमीदार**

महाराष्ट्र शिक्षक पॅनलच्या वतीने राज्यातील गुणवंत शिक्षकांना देण्यात येणारा राज्यस्तरीय सेवासन्मान आदर्श शिक्षक पुरस्कार २०२२ हा पुरस्कार उरण तालुक्यातील पाणदिवे गावातील सुपुत्र सध्या सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या कळंबोली येथील सुधागड विद्यासंकुलात अध्यापनाचे कार्य करत असणारे शिक्षक मनोज पाटील यांना प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार पुणे भोसरी येथे प्रदान करण्यात आला.



मनोज पाटील यांनी यांनी सुधागड एज्युकेशन सोसायटीच्या पेण तालुक्यातील रावे येथील माध्यमिक शाळेत १९९६ मध्ये आपल्या अध्यापण कार्याला सुरूवात केली होती.

शैक्षणिक कार्याबरोबरच त्यांनी आपल्या महाराष्ट्र युवा प्रतिष्ठान पाणदिवे या सेवाभावी संस्थेच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, क्रीडा व पर्यावरण क्षेत्रात भरीव कार्य केले आहे. आजपर्यंत त्यांना अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल शाळेचे प्राचार्य राजेंद्र पालवे, उपप्राचार्या सरोज पाटील, महाराष्ट्र शिक्षक पॅनल रायगड विभाग प्रमुख सुरेश शिंदे, शिक्षक कर्मचारी वर्ग, चाहत्यांनी शिक्षक मनोज पाटील यांचे अभिनंदन केले आहे.



**पनवेल : साई ग्रुप ग्रामपंचायतीचे माजी सरपंच विद्याधर मोकल यांना वाढदिवसानिमित्त उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप उरण तालुका अध्यक्ष रवी भोईर, तारा गावचे माजी उपसरपंच विद्याधर जोशी आदी उपस्थित होते.**

# जागतिक कुटुंब दिन उत्साहात

## नवी मुंबई पालिकेतर्फे सफाईमित्र कामगारांचा कुटुंब मेळावा

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिका हेदेखील एक कुटुंब असून त्यामधील एक महत्त्वाचा घटक असलेल्या सफाईमित्रांच्या कुटुंबीयांसमवेत आजचा जागतिक कुटुंब दिन साजरा करण्याचा आनंद काही वेगळाच आहे, अशा शब्दांत घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. बाबासाहेब राजळे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.



संयुक्त राष्ट्र महासभेने १९९३ मध्ये घोषित केल्यानुसार १५ मे हा दिवस संपूर्ण जगभरात जागतिक कुटुंब दिन म्हणून साजरा करण्यात येतो. यानिमित्त नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली सफाईमित्र कामगारांच्या कुटुंब मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी शहर अभियंता संजय देसाई, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त तथा स्वच्छ भारत मिशनचे महानगरपालिका नोडल अधिकारी डॉ. बाबासाहेब राजळे, कार्यकारी अभियंता आरविंद शिंदे, मुख्य स्वच्छता अधिकारी राजेंद्र सोनावणे, उपअभियंता स्वप्नील देसाई, वैभव देशमुख, दिलीप बेनके आदी उपस्थित होते.

स्वच्छ सर्वेक्षणांतर्गत सफाईमित्र सुरक्षा चॅलेंजमध्ये नवी मुंबई महानगरपालिकेस देशात द्वितीय क्रमांकाचे मानांकन लाभले आहे. मॅनहोलऐवजी मशीनहोल असे सफाईमित्रांच्या सुरक्षेची संपूर्ण काळजी घेणारे मलनि:स्सारण वाहिन्या व सेप्टिक टँक सफाईचे अत्याधुनिक स्वरूपातील यांत्रिकी रूपांतरण नवी मुंबई महानगरपालिकेने आधीपासूनच प्रभावीपणे राबविण्यास सुरूवात केलेली आहे. त्याचप्रमाणे सफाईमित्रांच्या सक्षमीकरणासाठी विविध योजना सुरू केलेल्या आहेत, त्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्तीची सुविधा आहे. त्यांच्या आरोग्याकडेही विशेष लक्ष देत विहित कालावधीत तपासणी केली जात आहे. त्यांना सफाईमित्र संबोधन लाभल्याने या कामगारांमध्ये आपल्या कामाविषयी सकारात्मक मानसिकता निर्माण झालेली आहे तसेच त्यांच्या कुटुंबियांमध्येही या कामाविषयी समाधानाची भावना आहे. याचेच दर्शन घडविणारी एक विशेष चित्रफित या वेळी प्रदर्शित करण्यात आली.

या कौटुंबिक स्नेहसंमेलनानिमित्त उपस्थित सफाईमित्रांच्या कुटुंबियांच्या मनोरंजनासाठी मराठी, हिंदी गीतांच्या सुमधुर वाद्यवृंदाचे आयोजन करण्यात आले होते. त्याचप्रमाणे स्नेहभोजनाची व्यवस्था करण्यात आली होती. या सर्वांनी एकत्रितपणे हा कुटुंब दिन अतिशय उत्साहात साजरा करताना ही आगळीवेगळी संकल्पना राबविल्याबद्दल आनंद व्यक्त केला.

# नवी मुंबईत फ्लेमिंगो फेस्टीव्हल रंगला

## पाणथळीचे संरक्षण करणे अत्यावश्यक -बांगर

**नवी मुंबई : बातमीदार**

पर्यावरणप्रेमींच्या गटाने आयोजित केलेल्या पहिल्या-वहिल्या फ्लेमिंगो फेस्टीव्हलचे कौतुक करत पाणथळ क्षेत्राचे संरक्षण अत्यावशक आहे यावर नवी मुंबई आयुक्त अभिजित बांगर यांनी भर दिला. फ्लेमिंगोंची उपस्थिती अकस्मात वाढलेली नाही, तसेच ही स्थिती नवी मुंबई प्रदेशातील प्रचंड मोठ्या जैवविविधतेचे महत्त्व अधोरेखित करणारी असल्याचे बांगर म्हणाले. पर्यावरणप्रेमींनी आयोजित केलेल्या फ्लेमिंगो फेस्टीव्हलचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.



या महोत्सवाचे आयोजन दिल्ली पब्लिक स्कूल (डीपीएस), नेरूळ येथे शनिवारी जागतिक स्थलांतरीत पक्षी दिनाच्या निमित्ताने करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे आयोजन नाटकनेक्ट फाऊंडेशन, खारघर वेटलँडस् अ‍ॅण्ड हिल्स तसेच सेव्ह द नवी मुंबई एनव्हायर्नमेंट यांनी संयुक्तपणे केले होते. हे शहर आता फ्लेमिंगो सिटी म्हणून नावारूपाला येत असून या महोत्सवामुळे आणखी एक निराळी ओळख प्राप्त झाली असल्याचे बांगर यांनी सांगितले.

कार्यक्रमात शालेय विद्यार्थ्यांनी दाखवलेल्या उत्साहाचे कौतुक बांगर यांनी केले व त्यांनी याठिकाणी लहानशी फेरी काढत पर्यावरणाप्रती आपल्या प्रेमाचे प्रदर्शन केले. अलीकडे पर्यावरणाविषयी गप्पा करणे ही एक फॅशन झाली आहे, असे ते म्हणाले. निसर्गाचे रक्षण करण्याप्रती प्रत्येक व्यक्ती सजग असलीच पाहिजे हे त्यांनी ठासून सांगितले. या पार्श्वभूमीवर बोलताना त्यांनी सांगितले की, अशाप्रकारचे कार्यक्रम आपल्या पाणथळी आणि कांदळवनांचे रक्षण करण्यात भरीव योगदान देतात.

क्लेमेंट बेन, अतिरिक्त प्रधान वन संरक्षक (वन्यजीव)- पश्चिम म्हणाले की, ढासळलेल्या पर्यावरणाचे संतुलन साधण्यासाठी हा फ्लेमिंगो फेस्टीव्हल चांगल्या पद्धतीने जगजागृती करणार आहे. ही लोक चळवळ ठरेल असेही ते म्हणाले.

नाटकनेक्ट फाऊंडेशनचे संचालक बी एन कुमार म्हणाले की, नवी मुंबई महानगर प्रदेश (एमएमआर) क्षेत्रातील लोकांनी मोठा रस दाखवून महोत्सवाला भरभरून प्रतिसाद दिला. यावेळी आयोजित प्रदर्शनात वन्यजीव छायाचित्रकार आणि निसर्ग प्रेमींनी फ्लेमिंगो आणि जैवविविधतेविषयक कॅमेराबद्ध करण्यात आलेली ७० छायाचित्रे मांडण्यात आली होती.

खारघर वेटलँडस् आणि हिल्सच्या ज्योती नाडकर्णी म्हणाल्या, आगामी वर्षांतही फेस्टीव्हलचे आयोजन करण्यात येतील. लहान मुल उद्याचे जबाबदार नागरीक असल्याने त्यांच्यात पर्यावरण जनजागृतीची गरज असल्याचे डीपीएसचे मुख्याध्यापक जे मोहंती म्हणाले.





(छाया : संजय खांबेटे)

# भाजप नेते कृष्णा कोबनाक यांच्या हस्ते म्हसळ्यात समाजमंदिराचे उद्घाटन

**म्हसळा : प्रतिनिधी**

बदलत्या युगात तंत्रज्ञानामध्ये मोठ्या प्रमाणात परिवर्तन होत आहे ते स्वीकारून नवीन पिढीला मार्गदर्शन करण्यासाठी या समाज मंदिराच्या इमारतीचा वापर करावा, असे आवाहन भाजप नेते कृष्णा कोबनाक यांनी सोमवारी (दि. १६) म्हसळा तालुक्यातील बनोटी येथे केले.

चिंचबादेवी प्रासादिक भजन मंडळाने बनोटी येथे उभारलेल्या समाज मंदिराचे उद्घाटन सोमवारी कृष्णा कोबनाक यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी झालेल्या कार्यक्रमात कोबनाक बोलत होते. भविष्यात स्थानिक पातळीवर रोजगार निर्मितीसाठी मंडळाच्या सदस्यांनी पुढाकार घ्यावा, असे मत त्यांनी या वेळी व्यक्त केले.

गावातील बहुतांश कुटुंबे स्थलांतरित होत आहेत, ते थांबविण्याचे काम समाज बांधवांनी करावे, असे कोबनाक या वेळी म्हणाले. मंडळातील सर्व ज्येष्ठ पदाधिकाऱ्यांचा या वेळी यथोचित सन्मान करण्यात आला.

भाजपचे म्हसळा तालुका अध्यक्ष प्रकाश रायकर, सरचिटणीस सुनील शिंदे, महेश पाटील शहर अध्यक्ष संतोष पानसरे, उपाध्यक्ष लहू तूरे, चिटणीस मनोहर जाधव, दिलीप कोबनाक, गोविंद भायदे, महिला मोर्चा अध्यक्षा सुनंदा पाटील यांच्यासह मंडळाचे कार्यकर्ते आणि ग्रामस्थ या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. ग्रामपंचायत मंडळाचे अध्यक्ष हरिश्चंद्र कांबळे, मुंबई मंडळ अध्यक्ष रघुनाथ भायदे, काशिनाथ कांबळे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.

# खुनाचा प्रयत्न करून चोरी करणाऱ्या त्रिकुटाला कोठडी

## ■ बोरघाटात घडला होता गुन्हा

**खालापूर : प्रतिनिधी**

बोरघाटातील शिंग्रोबा मंदिरासमोर रात्री वेळी मोटरसायकलस्वारास अडवून त्याच्या ताब्यातील मोटरसायकल हिसकावून घेत त्याला दरीत फेकून देऊन पोबारा केलेल्या तिघा जणांना खोपोली पोलिसांनी जेरबंद केले असून, न्यायालयाने त्यांना तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.




कर्जत चिंचवली येथील अशोक बुंधारे (वय ४०) हे त्यांच्या ताब्यातील मोटरसायकलने १३ मे २०२२ रोजी रात्री मुंबई-पुणे जुन्या महामार्गावरून जात होते. बोरघाटातील शिंग्रोबा मंदिरासमोर तिघा जणांनी त्यांना अडविले. व त्याच्या ताब्यातील मोटरसायकल हिसकावून घेत त्यांना २०० फुट खोल दरीत फेकून दिले व पोबारा केला. सुदैवाने बचावलेल्या अशोक बुंधारे यांनी मोबाइलवरून या घटनेची माहिती खोपोली पोलिसांना दिली.

पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी दाखल होत बुंधारे यांना दवाखान्यात दाखल केले व नाकाबंदी लाऊन आरोपींचा शोध घेतला. मात्र तिनही आरोपी हाती लागले नाहीत.

खोपोलीचे पोलीस निरीक्षक शिरीष पवार, सहाय्यक निरीक्षक हरेश कळसेकर व त्यांच्या पोलीस सहकाऱ्यांनी सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या आधारे संशयित आरोपी स्वप्निल मोहन हरणमारे, नवीन लिंगाण्णा मेहेत्रे, गणेश/प्रथमेश पंडित भालेकर (सर्व रा. चिंचवड, पुणे) यांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. पोलिसांनी आरोपींकडून गुन्ह्यात वापरलेली टाटा इंडिका कार, हत्यारे, व चोरून नेलेली मोटरसायकल हस्तगत केली. या सर्व आरोपींना खालापूर न्यायालयाने तीन दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत.

# माथेरान पालिकेच्या प्रारूप प्रभाग रचनेला सहा जणांच्या हरकती

**कर्जत : बातमीदार**

१ जानेवारी २०२२ रोजी मुदत संपलेल्या माथेरान गिरिस्थान नगर परिषदेच्या २० जागांसाठीचा प्रारूप प्रभाग रचना आरखडा जिल्हाधिकाऱ्यांनी नेमलेल्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी जाहीर केला आहे. या प्रारूप आराखड्यातील अनुसूचित जमातीसाठी राखीव ठेवण्यात येणाऱ्या संभाव्य आरक्षणास हरकती घेण्यात आल्या आहेत.

माथेरान गिरिस्थान नगर परिषदेची सार्वत्रिक निवडणूक आगामी काळात होणार आहे. ओबीसी आरक्षणाचा विषय बाजूला ठेवून २७ टक्के ओबीसी आरक्षणाच्या जागा या सर्वसाधारण गटामध्ये समाविष्ट करून प्रारूप प्रभाग रचना आराखडा जाहीर करणे, त्या आराखड्यास हरकती, सूचना आक्षेप घेणे, त्या हरकतींवर जिल्हाधिकाऱ्यांनी सुनावणी घेणे, कोकण विभागीय आयुक्तांकडून प्रारूप प्रभाग रचना आरखडा अंतिम करणे आणि अनुसूचित जाती-जमाती यांचे आरक्षणासह प्रारूप प्रभाग रचना आरखडा



(छाया : संतोष पेरणे)

प्रसिद्ध करण्याचा कार्यक्रम राज्य निवडणूक आयोग यांच्या आदेशाने सध्या राबविला जात आहे.

माथेरान नगर परिषदेसाठी लोकसंख्येनुसार नगरसेवकांच्या तीन जागा वाढल्या असून आता २० जागांसाठी निवडणूक होणार आहे. १० प्रभागात प्रत्येकी दोन जागा असे दहा प्रभागातून २० सदस्य निवडले जाणार आहेत. ओबीसी आरक्षणाशिवाय निवडणूक होण्याची शक्यता लक्षात घेऊन २० पैकी १६ जागा सर्वसाधारण प्रवर्गासाठी असणार आहेत, तर अनुसूचित जातीसाठी तीन आणि अनुसूचित जमातीसाठी एक जागा राखीव असणार आहे. या २० जागांमध्ये ५० टक्के महिला आरक्षण आहे.

> **प्रारूप प्रभाग रचना जाहीर केल्यानंतर हरकती आणि आक्षेप घेण्यासाठी कालावधी देण्यात आला होता. आलेल्या हरकती आणि आक्षेपांची सुनावणी २३ मे रोजी रायगडचे जिल्हाधिकारी घेणार आहेत.**
> **-सुरेखा भणगे, मुख्याधिकारी, माथेरान गिरिस्थान नगर परिषद**

रायगड जिल्हाधिकाऱ्यांनी प्राधिकृत अधिकारी म्हणून अधिकार दिलेल्या माथेरान नगरपालिकेच्या मुख्याधिकारी सुरेखा भणगे यांनी प्रारूप प्रभाग रचना आरखडा १० मे रोजी प्रसिद्ध केला होता. त्या आराखड्यास हरकती आणि आक्षेप घेण्यासाठी १४ मेपर्यंत कालावधी होता. या कालावधीत मुख्याधिकाऱ्यांच्या कार्यालयात प्रभाग सातमधील अनुसूचित जमाती आरक्षणास माथेरानमधील सहा जणांनी आक्षेप घेतला आहे. रायगड जिल्हाधिकाऱ्यांसमोर २३मे रोजी या हरकतींवर सुनावणी घेण्यात येणार आहे. त्यानंतर ६ जून रोजी कोकण विभागीय आयुक्त प्रारूप प्रभाग रचना अंतिम करणार आहेत. तर ७ जून रोजी अंतिम प्रभाग रचना प्रारूप आरखडा प्रसिद्ध केला जाणार आहे.

# पेणमध्ये छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्साहात

**पेण : प्रतिनिधी**

छावा क्रांतिवीर सेनेच्या वतीने पेण चिंचपाडा येथे शनिवारी (दि. १४) संध्याकाळी छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी करण्यात आली. पेण शहरात छत्रपती संभाजी महाराज यांच्या नावाचा भव्यदिव्य चौक उभारण्यात येईल, असे आश्वासन या वेळी आमदार रविशेठ पाटील यांनी दिले.

पेण शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातून छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेची ढोल ताशांच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली होती. ही मिरवणूक संपूर्ण पेण शहरातून फिरविण्यात आली. पेणमधील शांतिनिकेतन सोसायटीसमोर होणाऱ्या चौकाचे या वेळी छत्रपती संभाजी महाराज चौक असे नामकरण करण्यात आले.




(छाया : अनिस मनियार)

आमदार रविशेठ पाटील, माजी नगराध्यक्ष संतोष श्रृंगारपुरे, माजी उपनगराध्यक्ष जितेंद्र ठाकूर, माजी नगरसेवक समीर म्हात्रे, पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ, हभप रामकृष्ण महाराज, संदिप ठाकूर, छावा क्रांतिवीर सेनेचे रायगड जिल्हाध्यक्ष रोशन पवार, पनवेल तालुका उपाध्यक्ष आदित्य वाघ, खालापूर तालुका अध्यक्ष सचिन भालेराव, अलिबाग तालुका अध्यक्ष महेश घरत, कार्याध्यक्ष राजेश मोकल, उरण तालुका अध्यक्ष अभिजित मोकल, पेण तालुका अध्यक्ष जितेंद्र ठाकूर, उपाध्यक्ष नरेश म्हात्रे, तालुका सचिव दिलीप माळी, पेण शहर अध्यक्ष दीपक संसारे, सल्लागार दिलीप साळवी, अलिबाग महिला अध्यक्षा प्राजक्ता थळे, स्वप्नील घरत, राजेश रसाळ, अनिल दरेकर, राम ठाकूर विभागीय अध्यक्ष समाधान म्हात्रे, राजू ठाकूर, अंकुश वाघमारे, संजय पवार, किशोर चाळके यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पेणजवळ भरधाव कारची दुचाकीला धडक

## दोन जण जखमी; वाहनांचे नुकसान

**पेण : प्रतिनिधी**

मुंबई - गोवा महामार्गावर पेणजवळील वाशीनाका गावच्या हद्दीत भरधाव कारने पुढे जाणाऱ्या दुचाकीस धडक दिली. या अपघातात दुचाकीवरील दोन जण जखमी झाल्याची घटना घडली आहे.

फिर्यादी सुजित लक्ष्मण पाटील (वय ४२, रा. खिडकी, ता. अलिबाग) हे त्यांच्या ताब्यातील मोटार सायकल (एमएच-०६,बीबी-३७१४) चालवित शनिवारी (दि. १४) संध्याकाळी मुंबई ते अलिबाग जात होते. मुंबई-गोवा महामार्गावरील वाशीनाका गावच्या हद्दीत गतिरोधक जवळ आल्याने त्यांनी मोटारसायकलचा वेग कमी केला. त्यावेळी पाठीमागून आलेल्या कार (एमएच-४३,आर-९६८९) मोटारसायकलला धडक दिली. या अपघातात सुजित पाटील व साक्षीदार प्रतीक जगन्नाथ पाटील हे रस्त्यावर पडून जखमी झाले. व दोन्ही वाहनाचे नुकसान झाले.

या बाबत सुजित पाटील यांनी दिलेल्या फिर्यादीवरून कार चालक विवेक माणिक मोरे (वय २५, रा. डोंबिवली) याच्यावर पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास महिला पोलीस नाईक कांबळे करीत आहेत.

# कर्जत देऊळवाडीत मूर्तींची प्राणप्रतिष्ठा

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील देऊळवाडी गावामध्ये जीर्णोद्धार केलेल्या मंदिरात श्री भैरवनाथ व श्री जोगेश्वरी मातेच्या मूर्तींची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. दोन दिवस चाललेल्या या समारंभात



(छाया : विजय मांडे)

धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी परिसरातील ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली होती.

पहिल्या दिवशी सकाळी मंदिराची वास्तुशांती करण्यात आली. त्यानंतर श्री गणेश पूजन, पुण्याहवाचन, मातृकापूजन, वास्तुमंडल स्थापना, प्रसाद वास्तुपूजन, नवग्रह स्थापना, होमहवन व पूर्णाहुती करण्यात आली. दुपारी श्रींची नगरप्रदक्षिणा देऊळवाडी, बोरवाडी, पुलाचीवाडी, किरवली या गावांमध्ये पालखी मिरवणुकीने काढण्यात आली. त्यानंतर सायंकाळी श्रींवर जलाधिवास, धान्याधिवास, निद्राधिवास करण्यात आला. रात्री हरिपाठ आणि चक्रीभजनाचे आयोजन करण्यात आले होते.

दुसऱ्या दिवशी पहाटे काकड आरती त्यानंतर श्री गणेश पूजन, पुण्याहवाचन, मातृकापूजन, कलशपूजन, ध्वजपूजन आणि राजेश जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली श्रींची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. या वेळी यजमान नितीन बडेकर, दिलीप बडेकर, शरद बडेकर, विठ्ठल जाधव, प्रकाश बडेकर, किसन बडेकर, विवेक पाटील सपत्नीक उपस्थित होते. सायंकाळी गुरुवर्य हभप मारुती महाराज राणे व अन्य मान्यवरांचा अध्यक्ष किसन बडेकर यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. रात्री हरिकीर्तनाने सोहळ्याची सांगता करण्यात आली.

# फणसाड अभयारण्यातील वन्यजीव गणना सुरू

**मुरुड : प्रतिनिधी**

तालुक्यातील फणसाड अभयारण्यातील वन्यजीव मोजणीस सोमवारी (दि. १६) सुरुवात करण्यात आली. अभयारण्यातील प्रत्येक प्राण्याची मोजणी व नोंद एका वहीत करण्यात येणार असून हा रेकॉर्ड काही दिवसानंतर जाहीर करण्यात येणार आहे.

फणसाड अभयारण्यामध्ये दरवर्षी बुद्ध पौर्णिमेच्या चंद्रप्रकाशात वन्यजीवांची मोजणी केली जाते.त्यासाठी अभयारण्य प्रशासनाकडून पाणस्थळांच्या ठिकाणी काठ्यांची मचान बनवण्यात आली आहेत. अभयारण्यातील प्रत्येक प्राण्याची मोजणी व नोंद वहीत करण्यात येणार असून हा रेकॉर्ड काही दिवसानंतर जाहीर करण्यात येणार



(छाया : संजय करडे)

आहे.

भारतातील बहुतांशी अभयारण्ये तथा राष्ट्रीय उद्याने राजे-महाराजे व संस्थानिकांच्या शिकारीच्या हौसेखातर राखून ठेवलेल्या क्षेत्रापैकी आहेत. अशाच प्रकारे पूर्वीचे केसोलीचे जंगल हे नबाब सिद्दींचे राखीव शिकार क्षेत्र म्हणजेच आजचे फणसाड अभयारण्य होय. त्याला १९८६ साली शासनाने अधिसूचित केले.

सुमारे ५४ चौरस किलोमीटर क्षेत्रात पसरलेल्या फणसाड अभयारण्यात बिबटे, रानगवे, ससा, डुक्कर, कोल्हे, हरीण, रानमांजर, सांबर, पिसोरी, वानर, भेकर, रानडुक्कर, साळींदर, मोठीखार अर्थात शेकरु आदींचा वावर आढळतो. तर सरपटणाऱ्या प्राण्यांमध्ये नाग, अजगर, मण्यार, फुरसे, घोणस, हरणटोळ, धामण आदी सापाच्या जाती आढळतात.

> **फणसाड अभयारण्य क्षेत्रात १५ ठिकाणी मचान बांधण्यात आलेल्या आहेत. जिथे वन्यजीव पाणी पिण्यासाठी येतात तिथे आमचे कर्मचारी त्यांची गणना करणार आहेत. काही खाजगी सस्थांचे सदस्यसुध्दा या कामात मदत करणार आहेत. वन्यजीव गणनेसाठी प्रशानाने संपूर्ण तयारी केली असून सर्व कर्मचारी आपल्या नियुक्त जागी पहारा करीत आहेत.**
> **-राजवर्धन भोसले, वनपरीक्षेत्र अधिकारी, फणसाड अभयारण्य, ता. मुरुड**

| जैव विविधता | प्रजाती |
|---|---|
| पक्षी | १६६ |
| प्राणी | १७ |
| साप | २७ |
| फुलझाडे | ९० |
| वृक्ष | ७१८ (वेलींसह) |

सोमवारी या अभयारण्यातील वन्यजीव मोजणीस प्रारंभ करण्यात आला. त्यासाठी अभयारण्य प्रशासनाकडून पाणस्थळांच्या ठिकाणी काठ्यांचे मचान बनवण्यात आले आहेत. वनरक्षक व वनमजूरांचे गट पाडण्यात आले असून, त्यांना त्या ठिकाणी तैनात करण्यात आले आहे या कामासाठी काही संस्थांचीसुध्दा मदत घेतली आहे. या अभयारण्यात अनेक पाण्याची स्त्रोत आहेत त्या ठिकाणी जागता पहारा देऊन वनकर्मचारी वन्यजीवांची संख्या मोजणार आहेत. पुढील काही दिवस त्यांचा मुक्काम या घनदाट जंगलात राहणार आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत **श्री. जोमा शंकर गायकर, श्रीमती भागुबाई नामदेव म्हात्रे, श्रीमती द्वारकाबाई नामदेव माळी, कै. गठू शंकर गायकर मयतचे वारस श्रीमती जनाबाई गठू गायकर, श्री. बळीराम गठू गायकर** यांच्याकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीच्या मालकी हक्काची खात्री करून घेण्याकरिता सदर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**परिशिष्ट**

**मौजे - पळस्पे, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड.**

| गट नं. / हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| २८/अ | ०-३१-६० <br> पो.ख. ०-०२-८० <br> **एकूण ०-३३-४०** | ७.२५ |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापूर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधित व्यक्ती, सरकारी/निमसरकारी/खाजगी संस्था यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. १६/०५/२०२२.**

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट,
वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ
अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल
दूरध्वनी क्र. २७४५६३०६

आयपीएलचा रनसंग्राम — आजचा सामना: मुंबई वि. हैदराबाद, रात्री. ७.३० वा., मुंबई

# राजस्थानची लखनऊवर मात

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलमध्ये रविवारी रात्री झालेल्या साखळी सामन्यात राजस्थान रॉयल्सने लखनऊ सुपर जायंट्सवर २४ धावांनी मात केली. राजस्थानने विजयासाठी १७९ धावांचे लक्ष्य दिले होते, मात्र लखनऊला १५४ धावांपर्यंतच मजल मारता आली. या विजयासह राजस्थानने गुणतालिकेत लखनऊसोबत बरोबरी साधली.



राजस्थान रॉयल्सने विजयासाठी दिलेले १७९ धावांचे लक्ष्य गाठताना लखनऊ संघाची सुरुवात अतिशय खराब झाली. लखनऊचे क्विंटन डी कॉक आणि आयुष बदोनी हे दोन्ही फलंदाज लागोपाठ बाद झाले. त्यानंतर संघाच्या २९ धावा झालेल्या असताना कर्णधार केएल राहुलही झेलबाद झाला. मग दीपक हुडा (५९) आणि कृणाल पांड्या (२५) यांनी बचावात्मक खेळ केला. या जोडीने ६५ धावांची भागिदारी करीत संघाला सांभाळले.

पांड्या आणि हुडा ही जोडी बाद झाल्यानंतर मात्र लखनऊच्या विजयाच्या आशा मावळल्या. शेवटच्या फळीतील एकही फलंदाज चांगली खेळी करू शकला नाही. जेसन होल्डरने एक धाव केली, तर दुषमंथा छमिरा खातेदेखील खोलू शकला नाही. परिणामी २० षटकांमध्ये लखनऊ संघाला १५४ धावा करता आल्या आणि राजस्थानचा २४ धावांनी विजय झाला.

तत्पूर्वी नाणेफेक जिंकून राजस्थानने फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, मात्र राजस्थानची सुरुवात खराब झाली. संघाच्या ११ धावा झालेल्या असताना सलामीला आलेला जोस बटरल अवघ्या दोन धावा करून बाद झाला. त्यानंतर यशस्वी जैसवाल (४१) आणि संजू सॅमसन (३२) यांनी संघाला सावरले. या जोडीने ६४ धावांची भागिदारी केली. त्यानंतर रियान पराग (१९) आणि देवदत्त पडिक्कल (३९) यांनीही चांगली खेळी केली. या जोडीने २१ धावांची भागिदारी केली. मधल्या फळीतील आर. अश्विन आणि ट्रेंट बोल्ट या जोडीने अनुक्रमे नाबाद १० आणि १७ धावा केल्या. शेवटी २० षटकांत राजस्थान संघाने १७८ धावा केल्या.

राजस्थान रॉयल्सने गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षणातही नेत्रदीपक कामगिरी केली. ट्रेंट बोल्ट, प्रसिध कृष्णा आणि ओबेड मॅकॉय या तिघांनी प्रत्येक दोन फलंदाजांना बाद केले, तर युझवेंद्र चहल आणि रविचंद्रन अश्विन यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला.

# रोहित शर्मा टीम इंडियाबाहेर जाणार?

## ■ कर्णधारपदासाठी दोन नावे चर्चेत

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



रोहित शर्माला आता भारतीय संघात स्थान मिळणार नसल्याचे समोर येत आहे. सध्याच्या घडीला रोहितकडे भारताच्या तिन्ही संघांचे कर्णधारपद आहे, पण रोहित संघात नसेल तर भारताचा कर्णधार कोण असेल हा मोठा प्रश्न उपस्थित झाला आहे. सध्याच्या घडीला भारताच्या कर्णधारपदासाठी दोन पर्याय असल्याचे समोर आले आहे.

विराट कोहलीनंतर भारताचे कर्णधारपद रोहितकडे आले होते. सध्याच्या घडीला रोहित आणि कोहली हे दोघेही चांगल्या फॉर्मात नाही. त्यामुळे विराट आणि रोहित हे दोघेही भारतीय संघाबाहेर जाणार असल्याचे समोर आले आहे. त्याचबरोबर लोकेश राहुल, जसप्रीत बुमरा आणि रिषभ पंत यांनाही भारतीय संघात स्थान मिळणार नसल्याचे दिसत आहे, पण या परिस्थितीत भारतीय संघाचे कर्णधारपद कोणाला मिळणार हा मोठा प्रश्न उपस्थित होऊ शकतो.

भारताच्या कर्णधारपदासाठी आता दोन मोठे पर्याय समोर आले आहेत. हार्दिक पांड्या हा भारताच्या कर्णधारपदासाठी पहिला पर्याय समजला जात आहे. सध्याच्या घडीला हार्दिकचे नेतृत्व हा चर्चेचा विषय आहे. आयपीएलमध्ये हार्दिककडे गुजरात टायटन्सचे नेतृत्व सोपविण्यात आले आहे. हार्दिकच्या नेतृत्वाखाली गुजरातच्या संघाने आयपीएलच्या प्लेऑफमध्ये प्रथम पोहचण्याचा मान पटकाविला आहे. सध्याच्या घडीला गुजरातच्या संघाचे १८ गुण झाले आहेत. आतापर्यंत आयपीएलमधील एकाही संघाला एवढे गुण मिळवता आलेले नाहीत. त्याचबरोबर हार्दिककडे आंतरराष्ट्रीय क्रिकेटचा दांडगा अनुभव आहे. दुखापतीमुळे तो भारतीय संघाबाहेर गेला होता, परंतु त्यानंतर हार्दिकचे नेतृत्व आयपीएलमध्ये चांगलेच बहरेलेले आहे. त्यामुळे हार्दिक हा भारतीय संघाच्या कर्णधारपदासाठी पहिला पर्याय ठरू शकतो.

भारताच्या संघासाठी कर्णधारपदासाठी दुसरा पर्याय असेल तो शिखर धवनचा, कारण भारतीय संघ जेव्हा श्रीलंकेच्या दौऱ्यावर गेला होता तेव्हा धवनकडे कर्णधारपद देण्यात आले होते. त्याच्याकडे भारतीय संघाच्या नेतृत्वाचाही अनुभव आहे. त्यामुळे आता भारताच्या कर्णधारपदी हार्दिक, शिखर किंवा अन्य कोणता खेळाडू येतो याची उत्सुकता सर्वांनाच असेल.

# चेन्नईची पुन्हा हार, गुजरातचा दणदणीत विजय

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलमध्ये रविवारी दुपारच्या सत्रात झालेल्या साखळी सामन्यात गुजरात टायटन्सने चेन्नई सुपर किंग्जला सात गडी राखून धूळ चारली. चेन्नईने अगोदर फलंदाजी करीत गुजरातसमोर विजयासाठी १३४ धावांचे लक्ष्य ठेवले होते. गुजरातने हे आव्हान सहज पूर्ण केले.

माफक आव्हान पाठलाग करताना गुजरातने सुरुवातीपासून आक्रमक पवित्रा घेतला. गुजरातचा सलामीवीर वृद्धीमान साहाने नाबाद अर्धशतकी खेळी केली. त्याने ५७ चेंडूंमध्ये सात चौकार आणि एक षटकार लगावत ६७ धावा केल्या. साहाच्या या खेळीमुळे गुजरातला विजयापर्यंत पोहोचणे सोपे झाले. सलामीला आलेल्या शुभमन गिलला (१८) मात्र मोठी खेळी करता आली नाही, तर मॅथ्यू वेडदेखील फक्त २० धावा करू शकला. गुजरातचा कर्णधार हार्दिक पांड्याला फक्त सात धावा करता आल्या, परंतु साहा आणि डेविड मिलर या जोडीने संघाला सावरत विजयापर्यंत पोहचवले.

तत्पूर्वी नाणेफेक जिंकत चेन्नईने सुरुवातीला फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. सलामीच्या ऋतुराज गायकवाडने अर्धशतकी खेळ करीत संघाला मोठ्या धावसंख्येपर्यंत घेऊन जाण्याचा प्रयत्न केला, मात्र मधल्या फळीतील फलंदाजांना धावा करण्यात यश आले नाही. ड्वेन कॉन्वे फक्त पाच धाव करू शकला, तर मोईन अली आणि एन जगदिशन यांनी अनुक्रमे २२ आणि ३९ धावा केल्या. या दोघांच्या खेळीचा संघाला चांगला फायदा झाला.

एफए चषक फुटबॉल स्पर्धा

# चेल्सीला नमवून लिव्हरपूल विजेता

**लंडन : वृत्तसंस्था**

लिव्हरपूलने पेनल्टी शूटआऊटमध्ये चेल्सीला ६-५ अशा फरकाने पराभूत करीत एफए चषक फुटबॉल स्पर्धेचे जेतेपद मिळवले.

अंतिम सामन्यात दोन्ही संघांनी चांगला खेळ केला, पण त्यांना गोल करण्यात अपयश आले. अखेरीस पेनल्टी शूटआऊटमध्ये कोस्टास त्सिमिकासने निर्णायक गोल करीत लिव्हरपूलला विजय मिळवून दिला.

दोन्ही संघ पेनल्टी शूटआऊटमध्ये ५-५ असे बरोबरीत होते, मात्र संघाच्या सातव्या प्रयत्नात चेल्सीचा मध्यरक्षक मेसन माऊंटला पेनल्टीला गोलमध्ये रूपांतरित करण्यात यश आले नाही. याउलट त्सिमिकासने चेंडू गोलजाळ्यात मारत लिव्हरपूलला विजय मिळवून दिला.

# रायडूने अद्याप निवृत्ती घेतली नाही

## चेन्नईच्या सीईओंची माहिती

**चेन्नई : वृत्तसंस्था**

चेन्नईचा दिग्गज खेळाडू अंबाती रायडूने आयपीएलच्या या हंगामानंतर निवृत्त होणार असल्याचे म्हणत लगेच माघार घेतली. रायडूच्या या कृतीनंतर चर्चेला तोंड फुटले आहे. तो क्रिकेटला खरंच रामराम ठोकणार का? असे विचारले जात आहे. त्यानंतर आता चेन्नईचे मुख्य कार्यकारी अधिकार काशी विश्वनाथ यांनी रायडूने अद्याप निवृत्ती घेतली नसल्याचे म्हटले आहे.

'इंडिया टुडे'ने विश्वनाथ यांच्या प्रतिक्रियेबाबत सविस्तर वृत्त दिले आहे. रायडू निवृत्त होणार असल्याचे वृत्त चुकीचे आहे. तो निवृत्त होणार नसून आम्हाला कसलीही चिंता नाहीये, असे विश्वनाथ म्हणाले तसेच आयपीएल २०२३मध्ये तो चेन्नई संघाचे प्रतिनिधित्व करणार का? असे विचारताच त्यांनी होय, तो सध्या निवृत्त होणार नाही, असेही सांगितले.



याआधी अंबाती रायडूने ट्वीट करत यंदाचे आयपीएलचे पर्व माझे शेवटचे असल्याचे म्हटले होते, मात्र नंतर लगेच त्याने हे ट्विट डिलीट केले. 'मला हे सांगण्यास आनंद होत आहे की, आयपीएचे हे पर्व माझे शेवटचे असणार आहे. मुंबई इंडियन्स आणि चेन्नई सुपर किंग्ज या दोन संघांसाठी जपळपास १३ वर्षांसाठी खेळलो. हा १३ वर्षांचा काळ माझ्यासाठी खूप चांगला होता. माझ्या या प्रवासाबद्दल मुंबई इंडियन्स आणि चेन्नई सुपर किंग्ज या दोन्ही फ्रेंचायझींचे आभार,' असे रायडूने ट्वीटमध्ये म्हटले होते.

दरम्यान, अंबाती रायडूने आयपीएलमध्ये अनेकवेळा मोठी खेळी केलेली आहे. त्याने आयपीएलमध्ये २०१० साली पदार्पण केले होते. त्याच्या कारकिर्दीत त्याने आतापर्यंत मुंबई इंडियन्स आणि चेन्नई सुपर किंग्ज या दोन संघांचे प्रतिनिधित्व केलेले आहे. २०१० ते २०१७पर्यंत तो मुंबईकडून खेळला. तर २०१८ साली मेगा ऑक्शनमध्ये त्याला चेन्नईने ६.७५ कोटी रुपयांत खरेदी केले होते. त्याने आयपीएलमध्ये आतापर्यंत एकूण १८७ सामने खेळले असून ४१८७ धावा केल्या आहेत. रायडूने २०१९ साली अशाच प्रकारे निवृत्ती जाहीर केली होती, मात्र पुन्हा तो खेळतोय.

# ऋतुराजने रचला विक्रम

## सचिन, पंतला टाकले मागे

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलमध्ये गुजरात टायटन्सविरुद्ध झालेल्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्जच्या ऋतुराज गायकवाडने दमदार खेळी केली. त्याने अर्धशतकी खेळी करीत चेन्नईचा डाव सावरण्याचा प्रयत्न केला. विशेष म्हणजे त्याने या सामन्यात एक अनोखा विक्रम रचत मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरलाही मागे टाकले आहे.



चेन्नईच्या ऋतुराज गायकवाडने अर्धशतकी खेळी केली. त्याने ४९ चेंडूंमध्ये एक षटकार आणि चार चौकार लगावत ५३ धावा केल्या. या सामन्यात ऋतुराजने अनोखा विक्रम रचला. त्याने आयपीएलमध्ये ३५ डावांत १२०५ धावा करीत सचिन तेंडुलकरचा विक्रम मोडला.

आयपीएलमध्ये ३५ डावांमध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्यांमध्ये ऋतुराजने अव्वल स्थान गाठले आहे. सचिनने आयपीएलमध्ये ३५ धावांत ११७० धावा केलेल्या आहेत, तर ऋषभ पंतनेही ३५ धावांत १०८५ धावा केलेल्या आहेत. या दोघांनाही मागे टाकत ऋतुराजने ३५ डावांत सर्वाधिक म्हणजेच १२०५ धावा केल्या.

# महिला टी-२० चॅलेंज स्पर्धेचे 'माय ११ सर्कल'कडे मुख्य प्रायोजकत्व


**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

एकीकडे आयपीएलची धूम सुरू असताना दुसरीकडे महिला टी-२० चॅलेंज सामन्यांची जय्यत तयारी सुरू आहे. या स्पर्धेसाठी माय ११ सर्कल या इंडियन फॅन्टॅसी क्रीटा मंचने मुख्य प्रायोजकत्वाचे अधिकार मिळवले आहेत. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) तसे अधिकृतरित्या जाहीर केले आहे.

महिला टी-२० चॅलेंज स्पर्धेतील सामने येत्या २३ ते २८ मे या कालावधित पुण्यातील एमसीए स्टेडियमवर खेळवले जाणार आहेत. या सामन्यांचे मुख्य प्रोयजकत्व मिळवण्यासाठी 'माय ११ सर्कल'ने यशस्वीरित्या बोलीमध्ये सहभाग घेऊन प्रायोजकत्वाचे अधिकार मिळवले आहेत.

या स्पर्धेत दक्षिण आफ्रिका, इंग्लंड, वेस्ट इंडिज, ऑस्ट्रेलिय तसेस भारतातील दिग्गज महिला क्रिकेटपटू सहभागी होतील. स्पर्धेमध्ये एकूण चार सामने खेळवले जाणार आहेत. भारतीय महिला क्रिकेट संघातील स्मृती मानधना, हरमनप्रीत कौर, शफाली वर्मा तसेच लॉरा वोल्वार्ड, सोफी एक्लेस्टोन, डिआंड्रा डॉटिन असे अनेक नामवंत खेळाडू या स्पर्धेत दिसतील.

## २३ मेपासून रंगणार थरार



**क्रिकेटच्या सर्व फॉरमॅटला प्रोत्साहन देण्याचे आमचे ध्येय आहे. महिला टी-२० चॅलेंज स्पर्धा ही याचाच एक भाग राहिलेली आहे. या स्पर्धेला मैदान तसेच मैदानाबाहेरही मोठे यश मिळालेले आहे.**
**-सौरव गांगुली, अध्यक्ष, बीसीसीआय**

# श्रीवर्धनमधील प्रीमियर लीगमध्ये एसजीसीसी लायन संघ विजेता




(छाया : भारत चोगले)

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन शहरातील गणेश आळी येथे प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेचे आयोजन रविवारी (दि. १५) करण्यात आले होते. या स्पर्धेत एसजीसीसी लायन संघाने विजेतेपद पटकाविले, तर एसजीसीसी किंग संघ उपविजेता ठरला.

स्पर्धेतील मालिकावीर विशाल सातम, उत्कृष्ट फलंदाज यशवंत वाठोरे, उत्कृष्ट गोलंदाज नंदन सातम, ऑरेंज कॅपचा मानकरी मिहीर सातम, पर्पल कॅपचा मानकरी यश सातम यांना सन्मानित करण्यात आले. याशिवाय ४०+चे विजेता राजू सुर्वे यांचा संघ आणि महिलांमध्ये एसजीसीसी क्वीन संघाने बाजी मारली.

सर्व विजेत्या संघांना पारितोषिक देण्यात आले. या स्पर्धेत लहान मुलांपासून महिला, ज्येष्ठ अशा सर्वांना खेळण्याची संधी प्राप्त झाली. प्रत्येक सामन्यातील सामनावीराला गौरविण्यात आले.

# रहाणे आयपीएलमधून 'आऊट'

**मुंबई : प्रतिनिधी**

प्लेऑफर्यंत पोहचण्यासाठी संघांत चुरस असताना कोलकाता नाईट रायडर्सची चिंता वाढली आहे. या संघातील वरिष्ठ फलंदाज अजिंक्य रहाणे दुखापतीमुळे बायो बबल सोडून आयपीएलमधून बाहेर पडला आहे. उर्वरित सामन्यात तो खेळणार नाही. मिळालेल्या माहितीनुसार त्याच्यावर बंगळुरू येथील राष्ट्रीय क्रिकेट अकादमीमध्ये उपचार करण्यात येणार आहेत.



क्रिकट्रॅकर या क्रिकेटविषयी माहिती देणाऱ्या संकेतस्थळाने दिलेल्या माहितीनुसार अजिंक्य रहाणेने दुखापतीमुळे आयपीएलमधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे. १४ मे रोजी हैदराबादविरोधातील सामन्यात फलंदाजीदरम्यान त्याच्या पायाला दुखापत झाली होती. दुखापत झालेली असतानाही त्याने फलंदाजी केली होती. त्याने या सामन्यात २४ चेंडूंमध्ये २८ धावा केल्या होत्या. आता मात्र त्याच्या पायाला त्रास जाणवत असल्यामुळे त्याने आयपीएलमधून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला आहे.

अजिंक्य रहाणे बंगळुरू येथील राष्ट्रीय क्रिकेट अकादमीमध्ये चार आठवडे राहणार असल्याची शक्यता आहे. त्यामुळे १ ते १७ जुलै या काळात भारत आणि इंग्लड यांच्यात होणाऱ्या सामन्यांतही तो सहभागी होण्याची शक्यता कमी आहे.









हे दैनिक मल्हार नेटवर्क प्रा. लि. च्या वतीने कृष्णा चांगु ठाकुर यांनी सिद्धकला प्रिंट मिडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., अॅट प्लॉट नं. डब्ल्यू-२३०, टी.टी. सी. इंडस्ट्रियल एरिया, खैरणे एम.आय.डी.सी., ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई -४००७१०, ठाणे जिल्हा, महाराष्ट्र येथे मुद्रीत करून शॉप नं. ४, अॅस्पायर प्राईड, प्लॉट नं. २२७, निअर रुपाली सिनेमा, पनवेल, जिल्हा - रायगड, पिन - ४१०२०६, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. ✲ संपादक : देवदास लक्ष्मण मटाले ✲ E-mail : ramprahar@gmail.com ✲ RNI Regn. No. MAH MAR/2008/26534.

"Printed and Published by **Krishna Changu Thakur** on behalf of **Malhar Network Pvt. Ltd.** and Printed at **Siddhakala Print Media and Publications Pvt Ltd. Plot No. W 230, T. T. C. Industrial Area, Khairne MIDC, Thane Belapur Road, Navi Mumbai - 400 710, Thane Dist, Maharashtra** and published from **Shop No. 04, Aspire Pride, Rupali Cowk, Panvel, Navi, Mumbai 410 206, Panvel, Raigarh- 410206, Maharashtra. RNI Regd. No. MAHMAR/2008/26534, Editor : Devdas Laxman Matale**